सेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासन
पुणे विद्यापीठ

* लघुप्रकल्प*
(२००९-२०१०)

# १. जैन विचारधारा
('सकाळ' वृत्तपत्रासाठी लघुलेख)

# २. जैन दृष्टीने गीता
('लोकमत' वृत्तपत्रासाठी ४९ लघुलेख)

भाग - १

डॉ. नलिनी जोशी
प्राध्यापिका, जैन अध्यासन
नोव्हेंबर २०१०

सेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासन
पुणे विद्यापीठ

* दोन लघुप्रकल्प *
(२००९-२०१०)

१. जैन विचारधारा
('सकाळ' वृत्तपत्रासाठी ४९ लघुलेख)

२. जैन दृष्टीने गीता
('लोकमत' वृत्तपत्रासाठी ४९ लघुलेख)

डॉ. नलिनी जोशी
प्राध्यापिका, जैन अध्यासन
नोव्हेंबर २०१०

**※ जैन विचारधारा ; जैन दृष्टीने गीता**

**※ संपादक**
नलिनी जोशी

**※ संपादन सहाय्य**
अनीता बोथरा
कौमुदी बलदोटा

**※ प्रकाशक**
सन्मति-तीर्थ (प्राकृत व जैनविद्या संशोधन संस्था)
८४४, शिवाजीनगर, बी.एम्.सी.सी.रोड
फिरोदिया होस्टेल, पुणे - ४११००४
फोन नं. - (०२०) २५६७१०८८

**※ सर्व अधिकार सुरक्षित**

**※ प्रकाशन : नोव्हेंबर २०१०**

**※ प्रथम आवृत्ति - १०००**

**※ मूल्य : रु. १५०/-**

**※ अक्षर जुळवणी - अजय जोशी**

**※ मुद्रक : कल्याणी कॉर्पोरेशन**
**१४६४, सदाशिव पेठ**
**पुणे - ४११०३०**
**फोन नं. - (०२०) २४४७१४०५**

## मनोगत

हिंदू, जैन आणि बौद्ध हे भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीतील तीन मुख्य विचारस्रोत आहेत. त्यापैकी हिंदू आणि बौद्ध विचारप्रवाहांचा परिचय सामान्य माणसाला बऱ्याच अंशी झालेला असतो. त्या तुलनेने जैन तत्त्वज्ञान, भाषासाहित्य, कला आणि इतिहास यांची ओळख अतिशय कमी असते. जैनविद्या (जैनॉलॉजी) ही एक संपूर्ण ज्ञानशाखा आहे. 'तिचा परिचय करून देण्यासाठी वृत्तपत्रासारख्या सशक्त माध्यमाचा उपयोग करून घेतला पाहिजे', हा विचार अनेक वर्षे मनात घोळत होता. पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या जैन अध्यासनात प्राध्यापिका म्हणून मानद नियुक्ती झाल्यानंतर या विचाराने अधिकच जोर धरला. गेल्या दोन तपातील अखंड वाचन, चिंतनातून प्रस्तुत 'जैन विचारधारा' उद्भूत झाली.

मा. अभयजी फिरोदिया यांनी 'जैन विचारधारा' सकाळ वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रसिद्ध व्हावी म्हणून विशेष प्रयत्न केले. गुरुपौर्णिमा ते ऋषिपंचमी (जुलै-सप्टेंबर २००९) ह्या ४९ दिवसात ती सकाळ वृत्तपत्रात क्रमाने प्रसिद्ध झाली. अनेक अनुकूल आणि काही प्रतिकूलही प्रतिसाद आले. एकूण अनुभव उत्साहवर्धक होता.

२०१० सालचा जून महिना उजाडल्यावर जैन धर्माशी संबंधित असलेल्या विषयांवर स्फुटलेखन करावे अशी इच्छा पुन्हा एकदा मनात निर्माण झाली. लोकमत वृत्तपत्राचा वाचक वेगळा असल्याने लोकमतकडे जैन अध्यासनाच्या तर्फे एक लेखयोजना पाठविली. जैन आणि जैनेतर दोघांनाही रस वाटण्याच्या दृष्टीने विषयाची निवड केली. गीतेसारख्या लोकप्रिय ग्रंथात व्यक्त झालेल्या तत्त्वज्ञानात्मक विचारांची जैन दृष्टिकोणातून समीक्षा करावी असे वाटते. सन्मति-तीर्थच्या विद्यार्थिनींबरोबर वेळोवेळी झालेल्या चर्चेमुळे ५० वेगवेगळ्या मुद्यांवर आपल्याला लिहिता येईल, असा विश्वास वाटला. लोकमतच्या संपादकांनी लेखांच्या परियोजनेचे चांगले स्वागत केले. २०१० च्या गुरुपौर्णिमा ते ऋषिपंचमी या ४९ दिवसांच्या कालावधीत लेखमाला प्रसिद्ध झाली. त्या लेखांवर आलेल्या प्रतिक्रियांसंबंधी 'उपसंहार' व 'आवाहन' या शीर्षकांच्या शेवटच्या दोन लेखात विस्ताराने माहिती दिली आहे. ती कृपया वाचकांनी वाचावी.

या दोन्ही लेखमाला पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची इच्छा मा. अभयजी फिरोदिया यांनी व्यक्त केली. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे व आर्थिक सहाय्यामुळे हे पुस्तक वाचकांच्या हातात पडत आहे.

पुस्तकाच्या लेखनापासून ते वितरणापर्यंत या प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्वांविषयी हार्दिक ऋण व्यक्त करते.

डॉ. नलिनी जोशी
मानद निदेशक,
सन्मति-तीर्थ, पुणे

* जैन विचारधारा *

सकाळ वृत्तपत्रासाठी

जैनविद्येच्या विविध अंगांवर प्रकाश टाकणारे ४९ लघुलेख

कालावधी : गुरुपोर्णिमा, ७ जुलै २००९

ते

ऋषिपंचमी, ४ सप्टेंबर २००९

# अनुक्रमणिका


१) 'जैनविद्या' म्हणजे काय ?
२) धर्मप्रवर्तक नि सुधारक
३) 'अवतार' आणि 'तीर्थंकर'
४) जनभाषेतून धर्मोपदेश
५) प्राकृत भाषेतून ग्रंथनिर्मिती
६) लोकभाषांशी घनिष्ठ संबंध
७) पंचमहाभूते व एकेन्द्रिय जीव
८) ही माझी पृथ्वी
९) पाणी हीच ज्यांची काया
१०) पाण्याचा काटेकोर वापर हे अहिंसा तत्त्वाचे पालन
११) पाण्यातील सृष्टीचा विचार
१२) दैनंदिन जीवनात वनस्पतींचा वापर
१३) वनस्पतीतील चैतन्याचे स्वरूप
१४) वनस्पतींची इंद्रिये : महाभारत व जैनशास्त्र
१५) मूलद्रव्ये
१६) शब्द अथवा ध्वनीचे स्वरूप
१७) 'जीव' तत्त्वाकडे पहाण्याचे दृष्टीकोन
१८) देवगति : चार गतीतील एक
१९) जीवांचा भ्रमणवृत्तांत
२०) स्वावलंबन
२१) पथप्रदर्शक शास्त्र
२२) निरर्थक हालचाली
२३) हानिकारक ध्याने कोणती ?
२४) वीतराग जिन
२५) शल्यचिकित्सा आणि शल्योद्धार
२६) सूडाचा प्रवास
२७) भावनांचे रंगतरंग
२८) समिति
२९) दैनंदिन जीवनात हिंसा-अहिंसा
३०) शांततामय सहजीवन
३१) अहिंसेचा मूलगामी विचार आणि आचार
३२) हिंसेचे कमी-अधिक फळ
३३) सिद्धान्ताचे सार
३४) धर्म-अधर्म : विश्वाचे अनिवार्य घटक
३५) बदल : एक स्थायी भाव
३६) कलांचे योगदान

## अनुक्रमणिका

३७) मंदिरनिर्मिती
३८) मूर्तिकला
३९) चित्रकला
४०) गुजराथचा राजा कुमारपाल
४१) मेगॅ–सीरियल
४२) नयवाद : दृष्टिकोण व अभिप्राय (१)
४३) नयवाद : दृष्टिकोण व अभिप्राय (२)
४४) शब्दांच्या अंतरंगात
४५) अनेकान्तवादी कोण ?
४६) अनेकान्तवाद आणि सापेक्षतावाद्
४७) 'ऋषिभाषित' ग्रंथातील 'अनेकान्तवाद'
४८) क्षमापना
४९) कर्मसिद्धान्त

## १. 'जैनविद्या' म्हणजे काय ?

हिंदू, जैन आणि बौद्ध हे भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीतील तीन मुख्य विचारस्रोत आहेत. तिन्हींच्या आचार-विचारातील पृथगात्मकता लक्षात घेता एका स्रोताला 'धर्म' म्हटले तर तिघांनाही 'धर्म' म्हणावयास पाहिजे. चार वेदांपासून उपनिषदांपर्यंतचे साहित्य, रामायण-महाभारत ही महाकाव्ये, सहा दर्शने आणि अठरा पुराणे यांच्या माध्यमातून जी परंपरा आपल्यापर्यंत पोहोचली त्याला आपण हिंदू, ब्राह्मण किंवा वैदिक परंपरा असे सोयीसाठी संबोधणार आहोत. त्याखेरीज भारतात ऋग्वेदपूर्वकाळापासून चालत आलेली तपस्या, निवृत्ती आणि संयमाला प्राधान्य देणारी परंपराही प्रवाहित होती. तिचा उल्लेख 'श्रमण परंपरा' या शब्दाने केला जातो. जैन आणि बौद्ध या परंपरा त्या श्रमण परंपरेच्या दोन सशक्त विचारधारा आहेत. हिंदू आणि बौद्ध विचारप्रवाहांचा परिचय सामान्य माणसाला बऱ्याच अंशी झालेला असतो. त्या तुलनेने जैन परंपरेची वैशिष्ट्ये नजरेत भरलेली नसतात.

आषाढी पौर्णिमेपासून आरंभ करून चार महिन्यांचा काळ हिंदूंप्रमाणेच जैनांमध्येही सामान्यत: पवित्र चातुर्मासाचा काळ समजला जातो. पायी विहार करणारे जैन साधु-साध्वी या काळात 'वर्षावास' म्हणजे 'एका ठिकाणी निवास' करतात. प्रवचने, धर्मध्यान, तपस्या, दान, स्वाध्याय अशा धार्मिक कृत्यांनी हा काळ गजबजलेला असतो. त्यापैकी गुरुपौर्णिमा ते ऋषिपंचमी हे ४९ मंगलमय दिवस आपण जैन विचारधारेचा परिचय करून घेणार आहोत.

जैनॉलॉजी अथवा जैनविद्या ही एक स्वतंत्र ज्ञानशाखा आहे. जैन इतिहास, आचारप्रणाली, तत्त्वज्ञान, वाङ्मय आणि कला हे जैनविद्येचे पाच मुख्य आयाम आहेत. संप्रदायभेदानुसार आचारप्रणालीमध्ये विविधता आढळते. त्यामुळे आचारभेदात न शिरता आपण इतर चार आयामांमधील काही विशेष मुद्यांचा विचार या 'जैन विचारधारेत' करून घेणार आहोत.

**********

## २. धर्मप्रवर्तक नि सुधारक

इ.स.पू. ६ व्या शतकात गौतम बुद्ध व महावीर हे प्राय: समकालीन विचारवंत होऊन गेले. परंतु गौतम बुद्ध हे बौद्ध धर्माचे संस्थापक होते. त्यांनी हा 'मध्यममार्ग' आपल्या प्रदीर्घ प्रत्यक्ष अनुभवातून नव्याने तयार केला. समाजाच्या तळागाळापर्यंत त्या हिरिरीने प्रसार केला. त्याला राजाश्रयही मिळाला. गौतम बुद्धांच्या आयुष्यकाळातच तो भारताबाहेरही पसरू लागला.

भ. महावीर हे, जैन धर्माचे, कालचक्राच्या विशिष्ट टप्प्यातील शेवटचे म्हणजे २४ वे तीर्थंकर होऊन गेले. त्यांच्या पूर्वी २५० वर्षे २३ वे तीर्थंकर पार्श्वनाथ होऊन गेले. २२ वे तीर्थंकर नेमिनाथ (अरिष्टनेमि) हे महाभारताच्या काळात होऊन गेले. जैन परंपरेनुसार ते वासुदेव श्रीकृष्णाचे चुलतबंधू होते. २१ वे तीर्थंकर नमिनाथ हे 'मिथिला' नगरीचे राजे होते. रामायणातील सुप्रसिद्ध विदेह राजर्षि जनकाच्या पूर्वजांपैकी ते असण्याची शक्यता अभ्यासक व्यक्त करतात.

त्यांच्या पूर्वीच्या तीर्थंकरांचे विस्तृत जीवनचरित्र उपलब्ध नाही. पहिले तीर्थंकर ऋषभदेव यांचे विस्तृत जीवनचरित्र जैन पुराणांमध्ये तसेच भागवत पुराणामध्ये उपलब्ध आहे. 'वैदिक संस्कृतीच्या उदयापूर्वीच्या काळातील सिंधु संस्कृतीच्या अवशेषांमध्ये तीर्थंकरांच्या अस्तित्वाचे पुरावे आढळतात' - असे काही पुरातत्त्ववेत्त्यांचे मत आहे.

सारांश काय, तर महावीर हे जैन धर्माचे संस्थापक नव्हेत. जैन धर्माचे ते २४ वे प्रवर्तक होऊन गेले. पार्श्वनाथांपासून परंपरेने त्यांना प्राप्त झालेल्या निर्ग्रंथ-श्रमण-धर्माचे त्यांनी पुनरुज्जीवन केले. त्या काळात त्याला 'जैन' हे नावही प्राप्त झाले नव्हते. तो 'निर्ग्रंथ' अथवा 'श्रमणां'चा, धर्म होता. समकालीन वातावरण ध्यानी घेऊन महावीरांनी पार्श्वनाथप्रणीत धर्मात आणि आचरणात योग्य ते बदल घडवून आणले. त्या अर्थाने ते 'धर्मसुधारक' ही होते.

**********

## ३. ‘अवतार’ आणि ‘तीर्थंकर’

पुराणांच्या काळात दृढमूल झालेली ‘अवतार’ संकल्पना हिंदू धर्मीयांच्या मनात खोलवर रुजलेली आहे. त्यानुसार वैकुंठलोकी निवास करणारा श्री विष्णू जगाच्या उद्धारासाठी युगायुगात अवतार घेतो. ‘यदा यदा हि धर्मस्य’ आणि ‘परित्राणाय साधूनाम्’या गीतेतील श्लोकांमधील विचारांचा हिंदू मनांवर विलक्षण पगडा आहे.

याच धर्तीवर जैन धर्मातील २४ तीर्थंकरांना ‘अवतार’ मानण्याकडे सर्वसामान्य व्यक्तींचा कल दिसतो. पण वस्तुस्थिती तशी नाही. तीर्थंकर हे परमात्म्याचे अवतार नव्हेत. विशिष्ट-विशिष्ट काळात जन्मलेले हे स्वतंत्र स्वतंत्र आत्मे अगर जीव आहेत. सर्वोच्च आध्यात्मिक ज्ञान म्हणजे ‘केवलज्ञान’ प्राप्त झाल्यानंतर आपल्या उर्वरित आयुष्यात जे निरलसपणे धर्मप्रसाराचे व संघबांधणीचे कार्य करतात त्यांना ‘तीर्थंकर’ संबोधण्यात येते. आयुष्याच्या अंतिम टप्प्यावर आत्ममग्न ध्यानावस्थेत शरीरत्याग करून ते सिद्ध, बुद्ध, मुक्त होतात. महावीर असे २४ वे तीर्थंकर होते.

हेतुपुर:सर जगाचा उद्धार, सज्जनांचे पालन आणि दुष्टांचा विनाश हे तीर्थंकरांचे जीवनोद्दिष्ट नसते. दया, करुणा, मैत्री, उपेक्षा या सहज स्वाभाविक भावनांनी ते जनकल्याण करतात. सामान्यत: २४ ही तीर्थंकरांचा जीवनक्रम अशाच प्रकारचा होता. ‘अवतरणा’ पेक्षा ‘आत्मिक उत्तरणा’वर त्यांचा भर होता.

भ. महावीर कोणाचेही अवतार नव्हते. ते मनुष्ययोनीत जन्मले. त्यांनी स्वप्रयत्नांनी आत्मिक विकासाची सर्वोच्च अवस्था प्राप्त केली. केवलज्ञानापासून निर्वाणापर्यंतच्या आयुष्यात लोककल्याण केले. निर्वाणानंतर ते कोणातही विलीन झाले नाहीत. प्रत्येक जीव एक ‘सत्’ द्रव्य आहे. जे सत् आहे ते नाहीसे होणार नाही. मुक्त जीव लोकाकाशाच्या अंतिम भागी सिद्धशिलेवर विराजमान आहेत. भ. महावीरांचा आत्माही तेथे सदैव विराजमान आहे. भ. महावीर आता पुढेही कधी अवतरणार नाहीत.

**********

## ४. जनभाषेतून धर्मोपदेश

आपल्याला सर्वांना माहीत आहे की ‘संस्कृत’ ही वेदकाळापासून भारताची वाङ्.मयभाषा होती. आरंभीचे सर्व वाङ्.मय मौखिक स्वरूपाचे होते. सुमारे इ.स.पू. चौथ्या शतकापासून आर्ष संस्कृतचे स्वरूप बदलून ‘अभिजात संस्कृत’ अस्तित्वात आली. भारतातील ज्ञानाचा प्रकर्ष दर्शविणारे अनेक ग्रंथ त्यानंतर तयार होऊ लागले. ‘संस्कृत’ ही प्राय: उच्चवर्णीयांची ज्ञानभाषा होती.

या सर्व काळात आम समाज कोणती भाषा बोलत होता ? उच्चवर्णीय सुद्धा जनसामान्यात वावरत असताना फक्त संस्कृतात बोलत होते की दुसऱ्या काही जनभाषा, बोलचालीच्या भाषाही अस्तित्वात होत्या ?

ज्या वेळी समाजातील विशिष्ट वर्ग संस्कृतात बोलत होता, त्याच वेळी सर्वसामान्य भारतीयांची जनभाषा होती ‘प्राकृत’. भारतासारख्या विशाल देशात एकाच प्रकारची प्राकृत भाषा असणे शक्य नव्हते. प्रांत, धार्मिक परंपरा आणि व्यवसायानुसार या भाषा वेगवेगळ्या होत्या. भरताच्या नाट्यशास्त्रात अनेक प्राकृत भाषांची नोंद आहे, त्यापैकी एक आहे ‘अर्धमागधी’.

भ. महावीरांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या तीस वर्षात ज्या भाषेत धर्मप्रसार केला ती भाषा होती ‘अर्धमागधी’. महावीरांच्या वेळी अभिजात संस्कृतची जडणघडण झालेलीच नव्हती. त्यांचा धर्मोपदेश जनसामान्यांसाठी होता. महावीरांनी त्यांच्या कार्यकाळात मगध आणि आसपासच्या प्रदेशात विहार केला. साहजिकच त्यांचे उपदेश ‘अर्धमागधी’ प्राकृतमध्ये आहेत.

महावीरांचे हे उपदेश प्रथम मौखिक आणि नंतर लेखी स्वरूपात आले. ते ४५ अर्धमागधी ग्रंथ ‘आगम’ या नावाने प्रसिद्ध आहेत. भाषातज्ज्ञांच्या दृष्टीने त्यातील ३-४ ग्रंथ ‘प्राचीन अर्धमागधी’ चे प्रमाणित नमुने आहेत. २६०० वर्षापूर्वीची प्राकृत समजून घेण्यास या जैन ग्रंथांखेरीज दुसरा तरणोपाय नाही.

**********

## ५. प्राकृत भाषेतून ग्रंथनिर्मिती

भ. महावीरांच्या नंतर सुमारे ३०० वर्षांनी जैनधर्मात श्वेतांबर आणि दिगंबर हे भेद दिसण्यास सुरवात झाली. इसवी सनाच्या पहिल्या दुसऱ्या शतकापासून दिगंबर आचार्यांनी अर्धमागधीपेक्षा वेगळ्या प्रचलित प्राकृत भाषेत ग्रंथनिर्मिती करण्यास आरंभ केला. त्या भाषेचे नाव होते 'शौरसेनी'. शूरसेन म्हणजे आजच्या भारतातील मथुरा व आसपासचा प्रदेश. त्या प्रांतात सामान्यत: बोलली जाणारी भाषा म्हणजे शौरसेनी. प्राचीन हिंदी आणि तिच्या काही उपभाषा या शौरसेनी भाषेमध्ये हळूहळू बदल होत विकसित झाल्या, असे भाषाविदांचे म्हणणे आहे.

दिगंबर आचार्यांनी जैनधर्माचे सिद्धांत व तत्त्वे सांगण्यासाठी 'शौरसेनी' या जनभाषेचा आश्रय घेतला. त्यांचे सर्व प्राचीन साहित्य शौरसेनीत आहे. शौरसेनीतील साहित्य कालक्रमाने नंतरचे असले तरी 'शौरसेनी' भाषा 'अर्धमागधी' इतकीच किंबहुना त्याहूनही प्राचीन आहे, असा अभ्यासकांचा दावा आहे. भास, कालीदास इ. संस्कृत नाटककारांच्या नाटकातही अनेक पात्रे शौरसेनी भाषेत बोलतात.

दिगंबर आचार्यांना पाचव्या शतकानंतर सिद्धांत आणि न्यायविषयक ग्रंथ लिहिण्यासाठी संस्कृत भाषा अधिक सोयीस्कर वाटू लागली. शिवाय अनेक आचार्य 'दाक्षिणात्य' असल्याने, त्यांच्या मातृभाषेहून वेगळ्या असलेल्या शौरसेनीत लिहिण्यापेक्षा त्यांनी संस्कृत भाषेला पसंती दिली.

आठव्या नवव्या शतकापासून दिगंबर आचार्यांनी संस्कृतच्या जोडीला 'अपभ्रंश'नावाच्या प्राकृत भाषांमध्ये पुराणे आणि चरित्रे (चरिते) लिहिण्यास आरंभ केला. 'अपभ्रंश' भाषा या मध्ययुगातील प्राकृत आणि आधुनिक बोलीभाषा यांच्यामधील दुवा म्हणून दाखविण्याजोग्या भाषा आहेत. आठव्या शतकापासून थेट पंधराव्या शतकापर्यंत दिगंबरीयांनी संस्कृतच्या जोडीजोडीने जनभाषा 'अपभ्रंशा'तून आपले लेखनकार्य चालू ठेवले.

**********

## ६. लोकभाषांशी घनिष्ठ संबंध

आपण पाहिलेच आहे की भ. महावीरांचे उपदेश 'अर्धमागधी' भाषेत आहेत. दिगंबरांचे प्राचीन ग्रंथ 'शौरसेनी'त आणि उत्तरकालीन ग्रंथ 'अपभ्रंशा'त आहेत.

इसवी सनाच्या चौथ्या पाचव्या शतकापासून श्वेतांबर आचार्य 'महाराष्ट्री' नावाच्या भाषेत लिहू लागले. त्यावेळचा 'महाराष्ट्र' आजच्या भौगोलिक महाराष्ट्रापेक्षा बराच विस्तृत असावा. याचाच अर्थ 'महाराष्ट्री' ही प्राकृत भाषा भारतातल्या बऱ्याच मोठ्या जनसमूहाला समजणारी होती. संस्कृत नाटकातील प्राकृत गाथा व गीते महाराष्ट्री भाषेत लिहिलेली दिसतात.

'आंध्रभृत्य सातवाहन' वंशाने महाराष्ट्रावर बराच काळ आधिपत्य गाजविले. प्रतिष्ठान (पैठण) आणि नासिक्य (नाशिक) ही त्यांच्या राज्यकारभाराची केंद्रे होती. ते राजे प्राकृत भाषेला उत्तेजन देणारे होते. विख्यात श्वेतांबर जैन आचार्यांचा विहार पैठण आणि नाशिक येथे होत असे. त्यामुळे त्यांना महाराष्ट्री भाषा अवगत होती.

मुळात पद्यरचनेला अनुकूल अशी महाराष्ट्री भाषा जैन आचार्यांनी गद्यासाठीही वापरली. काही प्रमाणात अर्धमागधी व शौरसेनीचा प्रभाव असणाऱ्या या भाषेचे नामकरण भाषातज्ज्ञांनी 'जैन महाराष्ट्री' असे केले आहे. श्वेतांबर आचार्यांनी चौथ्या शतकापासून पंधराव्या शतकापर्यंत या भाषेत महाकाव्ये, पुराणे, चरिते, कथा, कथाकोश, स्तोत्रे तसेच उपदेशप्रधान व आचारप्रधान असे शेकडो ग्रंथ लिहिले.

आधुनिक भाषांपैकी कन्नड, गुजराथी, हिंदी, मराठी इ. भाषांतील प्रारंभीचे लिखाण करण्यातही जैन आचार्यांचा पुढाकार दिसतो.

सारांश काय, तर जैन धर्माचा जनभाषांशी असलेला संबंध महावीरांपासून आजतागायत सतत घनिष्ठतेचा राहिला आहे. आजही तीन चार प्रादेशिक भाषांत सहजपणे प्रवचन देणारे अनेक साधु-साध्वी जैन समाजात आहेत.

**********

## ७. पंचमहाभूते व एकेन्द्रिय जीव

वैदिक अथवा ब्राह्मण परंपरा आणि जैन परंपरा यांमध्ये काही भेद अतिशय मूलगामी आहेत. सुप्रसिद्ध पंचमहाभूतांविषयी दोघांचे विचार उत्तरध्रुव आणि दक्षिणध्रुवाइतके परस्परभिन्न आहेत.

तैत्तिरीय उपनिषदाने सृष्टीचा क्रम, 'आत्मा-आकाश-वायू-अग्नी-पाणी-पृथ्वी-वनस्पती-अन्न-पुरुष' असा सांगितला आहे. पृथ्वी, जल (आप), तेज, वायु व आकाश ही पंचमहाभूते व शरीरातील पाच इंद्रिये यांच्यामधील कार्यकारणसंबंध उपनिषदांनी वारंवार सांगितलेला दिसतो. सांख्य दर्शनात स्पष्टपणे नमूद केले आहे की पंचमहाभूते ही अचेतन आहेत, जड आहेत.

जैन मान्यता याच्या अगदी विपरीत आहे. मुळात विश्वच कोण्या एकाने निर्मिलेले नाही. ही बाह्यसृष्टी त्यातील विविधतेसह अनादि आणि अनंत आहे. जैनांच्या मते आकाश हे अजीव, जड आहे. ते एक स्वतंत्र द्रव्य (catagory)आहे. पृथ्वी, आप (जल), तेज (अग्नी), वायु यांच्या जोडीला त्यांनी वनस्पतीचा विचार केला आहे.

पृथ्वी ते वनस्पति या पाचही गोष्टींना चैतन्य आहे, जीव आहे, प्राण आहे, संवेदनाही आहेत. पृथ्वी ते वनस्पती या पाचांना फक्त एकच इंद्रिय आहे. ते म्हणजे स्पर्शेन्द्रिय. म्हणून यांना 'एकेन्द्रिय जीव' असे संबोधले आहे.

'जळी स्थळी काष्ठी पाषाणी' ईश्वराचा साक्षात्कार होणे हे भक्तिपंथाचे वैशिष्ट्य आहे. परंतु जैनांच्या मते पृथ्वी, जल इ. खरेखुरेच 'सजीव' आहेत. त्यांच्यावर आघात झाले, प्रक्रिया केल्या, ते आपल्या उपयोगासाठी वापरण्यायोग्य केले की क्रमाक्रमाने अर्धमृत व मृत होतात ; निर्जीव बनतात. पृथ्वी, पाणी, अग्नी, वायु व वनस्पतींशी आपण अतिशय जपून वर्तन केले पाहिजे.

जैनांच्या अहिंसा संकल्पनेचा प्रारंभ एकेंद्रिय जीवांच्या रक्षणाने म्हणजे पर्यायाने पर्यावरणरक्षणाने होतो.

**********

## ८. ही माझी पृथ्वी

आकाशवाणी पुणे केंद्रावर सकाळी एका कार्यक्रमाचे शीर्षकगीत लागले होते. 'हे निळे निळे आकाश, ही हिरवी हिरवी धरती' - त्याचे ध्रुवपद होते 'ही माझी पृथ्वी'. मनाला स्पर्शून जाणारे हे गीत आहे.

पृथ्वीविषयीची कृतज्ञता 'पादस्पर्शं क्षमस्व मे' अशा शब्दात आपण व्यक्त करतो. तिला 'माता' किंवा 'काळी आई' म्हणतो. जैन विचारधारेत पृथ्वीचा विस्तृत विचार वेगळ्याच दृष्टीने केला आहे.

जैनांची 'पृथ्वीकायिक जीव' ही संकल्पना नीट समजून घेऊ. पृथ्वीचा म्हणजे माती, खडक अथवा खनिजाचा सूक्ष्मातिसूक्ष्म कण हे ज्या जीवाचे 'शरीर' म्हणजे 'काया' असते तो 'पृथ्वीकायिक जीव' होय. अशा अनेक पृथ्वीकायिकांचा समूह म्हणजे स्थूलपणे दिसणारी माती, खडक अथवा खनिजे होत. भूवैज्ञानिक सांगतात की मातीच्या एका सूक्ष्म अंशाच्या आश्रयाने सहस्रावधी 'बॅक्टेरिया' रहात असतात. जैन विचार त्या सूक्ष्म जंतूंविषयी तर सांगतोच, पण असेही म्हणतो की तो मातीचा कणच मुळी जिवंत आहे.

पृथ्वीकायिकांची चेतना 'सुप्त' आहे. त्याला 'स्पर्श' हे एकच इन्द्रिय आहे. त्यांचे प्रकार, योनी (उत्पत्ति-स्थान), शरीराकृती, आहार, श्वासोच्छ्वास, आयुष्य, व्याप्ती यांचे सविस्तर वर्णन जैन ग्रंथात आढळते.

नांगरणे, खणणे, जाळणे, ठोकणे, खोल उखणणे, तीव्र आम्ले मिसळणे इ. मानवी क्रिया पृथ्वीकायिक जीवांची 'शस्त्रे' आहेत. त्या आघातांनी ते जीव 'अर्धमृत' किंवा 'मृत' होतात. धान्य, भाजीपाला ही माणसाची गरज आहे. पृथ्वी गरजेपुरतीच वापरावी. सेंद्रिय खतांनी जिवंत ठेवावी. खनिज साठ्यांचा अतिरेकी वापर, भूजलाचे अतिरिक्त शोषण पृथ्वीकायिक जीवांच्या हिंसेचे कारण ठरतो. धर्म आणि पर्यावरणाचा किती सुरेख मेळ आहे ह्या संकल्पनेत !!

**********

## ९. पाणी हीच ज्यांची काया

परमेश्वराला ‘दयाघन’ अथवा ‘करुणासागर’ संबोधणे, रामाला किंवा कृष्णाला ‘घनश्याम’ आणि पाण्याला ‘जीवन’ म्हणणे, अशा गोष्टींमधून भारतीय संस्कृतीत पाण्याचे महत्त्व अधोरेखित केले जाते. ‘आचारांग’, ‘भगवती, ‘प्रज्ञापना’ आणि ‘गोम्मटसार’ या जैन ग्रंथांमधून पाण्याविषयी समग्र विचार केलेला दिसतो.

सामान्यत: असा समज आहे की जलकायिक (अप्-कायिक) जीव म्हणजे पाण्यामध्ये असलेले सूक्ष्म जंतू. जैन शास्त्रात पाण्याच्या थेंबाच्या आधारे रहाणाऱ्या सूक्ष्म जीवांची-बॅक्टेरियांची चर्चा तर केली आहेच परंतु ‘पणी’ ही ज्यांची ‘काया’ म्हणजे शरीर आहे त्यांना ‘जलकायिक जीव’ म्हटले आहे.

हे जलकायिक जीव ‘सूक्ष्म’ही आहेत आणि ‘बादर (स्थूल)’ही आहेत. पाण्याचे मुख्य दोन प्रकार आहेत - भौम (पृथ्वीवरील व पृथ्वीच्या पोटातील) आणि अंतरिक्ष (मेघरूपात तयार होणारे). हिम, गारा इ. घनीभूत पाणी आहे. ‘अवश्याय’ म्हणजे दवबिंदू. पावसाच्या पाण्याला ‘शुद्धोदक’ म्हटले आहे. गरम व गार पाण्याच्या झऱ्यांचा विचार आहे. क्षारोदकाचा अर्थ ‘कठिण पाणी’ करता येतो. ‘आम्लोदकवर्षा’ म्हणजेAcid rain असावा. ‘लवणोदक’ हे समुद्राचे खारे पाणी आहे. ‘उदओल्ल’ म्हणजे हवेतील बाष्प व आर्द्रता. ही निरीक्षणे व नोंदी सुमारे २००० वर्षापूर्वीच्या आहेत.

जैन पुराणात उल्लेख आहे की ‘दुषमादुषमा’ नावाच्या दु:खमय कालखंडानंतर, कस निघून गेलेली जमीन पुन्हा कसदार करण्यासाठी क्षीरोदक, घृतोदक इ. च्या वर्षा होतात. दूरदर्शनवरील ‘वाद-संवाद’ कार्यक्रमात एक शेतीतज्ज्ञ जमीन कसदार, जिवंत करण्यासाठी ‘पंचामृत प्रक्रिया वापरा’ असा सल्ला देत होते. त्यावेळी जैन पुराणातील वरील वर्षावांची प्रकर्षाने आठवण झाली.

**********

## १०. पाण्याचा काटेकोर वापर हे अहिंसा तत्त्वाचे पालन

‘पेयजल संपत चालले आहे’, ‘यापुढील युद्धे पाण्यावरून होणार आहेत’, या सध्याच्या ‘ज्वलंत’ चर्चा आहेत. जैन विचारधारेतून सुमारे २००० वर्षापूर्वीच पाण्याच्या वापराबद्दल कोणते मौलिक मार्गदर्शन मिळते, ते आजच्या लेखात पाहू.

असंख्य जलकायिक जीव जेव्हा एकत्रित येतात तेव्हा ते ‘दृश्य पाणी’ या स्वरूपात येतात. प्रत्येक जलकायिक जीव ‘पृथक् सत्त्व’ आहे. हे जीव ‘सुप्तचेतना’ युक्त आहेत. त्यांना एकच इंद्रिय म्हणजे ‘स्पर्शेन्द्रिय’ आहे. पृथ्वीकायिकांप्रमाणेच त्यांना योनी, शरीर, आहार इ. सर्व काही आहे. प्रत्येकाने पाणी अगदी गरजेपुरते वापरले तर साहजिकच जलकायिक जीवांचे रक्षण होते. पाण्याचे मुळातले स्पर्श, रस, वर्ण, गंध हे गुण ज्या ज्या क्रियांमुळे बदलून जातात त्या त्या सर्व क्रिया ‘पाण्याची शस्त्रे’ आहेत. माती, तेल, क्षार, अग्नी इ. जलकायिक जीवांची ‘शस्त्रे’ आहेत. इंद्रियविकल मनुष्यांना ज्याप्रमाणे दु:खाची वेदना होते तशीच या जीवांना होते. पाण्याचा काटेकोर वापर म्हणजे अहिंसेचेच पालन होय.

‘पाण्याचा कमीत कमी वापर’ हेच जैन साधु व श्रावक आचाराचे सूत्र दिसते. मासेमारी, सरोवर-तलाव सुकविणे, वाहत्या झऱ्यांचे पाणी अडविणे इ. गोष्टी जैन श्रावकांसाठी वर्ज्य मानल्या आहेत.

वैदिक अथवा ब्राह्मण परंपरेत स्नान, पूजा, अभिषेक, अतिस्वच्छता इ. मध्ये पाण्याचा जो सढळ हाताने वापर केला जातो त्याबद्दल जैन ग्रंथात नाराजी व्यक्त केलेली दिसते. पाण्याने होणाऱ्या बाह्य शुद्धीपेक्षा आत्मशुद्धीवर भर दिसतो. ‘जलस्नानाने मोक्ष मिळत असता तर सर्व जलचर केव्हाच उद्धरून गेले असते ’ - असे उद्गार ‘सूत्रकृतांग’ ग्रंथात आढळतात.

**********

## ११. पाण्यातील सृष्टीचा विचार

सर्वसामान्य हिंदू धर्मीयांच्या जीवनपद्धतीत जलविसर्जनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पिढ्यान्‌पिढ्या आपण देवाचे निर्माल्य, नदीत विसर्जन करीतो. नदीत, समुद्रात गणपतींचे विसर्जन करतो. नद्यांमध्ये व विशेषत: गंगा नदीत अस्थिविसर्जनही करतो. जैन आचारपद्धतीत अशा विसर्जनाला स्थान नाही.

'प्रज्ञापना' आदि जैन ग्रंथात जलाच्या आश्रयाने रहाणाऱ्या जीवांचा विस्तृतपणे विचार केला आहे. पाण्याच्या आधारे अनेक प्रकारचे त्रस (हालचाल करू शकणारे) व स्थावर (हालचाल करू न शकणारे) जीव राहतात. जेथे जेथे जीवसृष्टी आहे तेथे तेथे ती जलकायिकाच्याच आधारे आहे. शंख, कच्छप (कासव), तंदुलमत्स्य, महामत्स्य इ. अनेक जलचर जीव पाण्यात राहतात. त्यांना प्रत्येकाला किती किती इन्द्रिये आहेत याचाही विचार केला आहे. शेवाळ, पनक इ. जलस्थ वनस्पतिसृष्टीही विचारात घेतली आहे. या जीवांची रक्षा करण्याचे आदेश वारंवार दिले आहेत.

जैन ग्रंथात कोणत्याही निरुपयोगी गोष्टींचे विसर्जन पाण्यात करावयास सांगितलेले नाही. 'मुंगी, किडे, हिरवळ इ. नसलेल्या ठिकाणी मल-मूत्र-कफ इ. चा त्याग करावा', असे म्हटले आहे. शिळे-पाके अन्न, इतर कचरा हा देखील अशा ठिकाणी टाकावा जेथे कोणालाही घृणा उत्पन्न होणार नाही, जेथे पृथ्वी व पाण्यातील जीवांची हानी होणार नाही. पारिभाषिक शब्दात याला 'परिष्ठापनिका समिति' अथवा 'व्युत्सर्ग' म्हणतात.

'वापरा आणि फेका' संस्कृतीत सध्या कचऱ्याचे ढीग प्रचंड डोकेदुखी आहे. या समस्या ज्या काळात निर्माणच झाल्या नव्हत्या, त्यांचाही दूरदर्शित्वाने विचार करून, जैन परंपरेने त्याला जीवविज्ञान, नागरिकशास्त्र व धर्म यांचा आधार दिला, हे लक्षणीय आहे.

**********

## १२. दैनंदिन जीवनात वनस्पतींचा वापर

हिंदू आणि जैन परंपरांचे पालन करणाऱ्या धार्मिक समुदायात, दैनंदिन व्यवहारात वनस्पतींच्या वापराबाबत लक्षणीय भेद दिसतो. दोघांची स्वयंपाकाची पद्धत वेगळी आहे. जैन पद्धतीत सामान्यत: कोथिंबीर, हिरवी मिर्ची, कढीपत्ता, ओले खोबरे इ. गोष्टी कमी वापरल्या जातात. सुक्या मसाल्याचा वापर अधिक केला जातो. जेवणातले पदार्थ बनवताना डाळींना प्राध्यान्य दिलेले असते. ताजे लिंबू, हिरवी चटणी, कोशिंबीर, २-३ भाज्या असा 'मेन्यू' पारंपारिक जैन भोजनात नसतो. लोणचे, पापड, सांडगे, गट्टे, बाफले, बाटी, ढोकळे, शेंगोळ्या इ. पदार्थांची रेलचेल असते.

वैदिक परंपरेतील ऋषि-मुनी कंदमुळे, पाने, फळे इत्यादींचा आहार घेत असल्याचे उल्लेख अनेक हिंदू ग्रंथात येतात. आजच्या हिंदू उपवास पद्धतीत बटाटा, रताळी, सुरण, साबुदाणा यांचा सरसकट वापर केला जातो. जैन उपवासात (अनशनात) फक्त वरीलच नव्हेत तर कोणतेही खाद्यपदार्थ वर्ज्य मानले जातात. बटाटा, रताळी इ. कंद 'अनंतकायिक वनस्पती' असल्याने धार्मिक दृष्टीने कायमच वर्ज्य मानल्या आहेत.

बेल, तुळस, दूर्वा, विविध प्रकारची पत्री, विशिष्ट रंगाची फुले, अनेक प्रकारच्या भाज्यांचे नैवेद्य - ही सर्व हिंदू पूजापद्धतीची वैशिष्ट्ये आहेत. जैन पूजापद्धतीत यांना स्थान नाही. मंदिरमार्गी जैन समाजात विशिष्ट काळात फुलांची 'आंगी' चढविली जाते परंतु दिगंबर जैन लोक अक्षता, सुका-मेवा, केशर इ. 'कोरड्या' पदार्थांचा वापर करतात. स्थानकवासी जैन मूर्तिपूजा करीत नाहीत.

रोगनिवारणाच्या पारंपारिक जैन पद्धतीत हिरव्यागार जिवंत वृक्षांची, वनस्पतींची साले, पाने, मुळे, फळे यांचा वापर टाळला जातो.

स्वयंपाक, उपवास, पूजापद्धती आणि रोगनिवारण यांमध्ये वनस्पतींचा उपयोग करताना, हिंदू आणि जैन विचारधारा स्पष्टपणे वेगळ्या दिसतात.

**********

## १३. वनस्पतीतील चैतन्याचे स्वरूप

आपण पाहिलेच आहे की जैन शास्त्रानुसार जे पाच एकेंद्रिय जीव आहेत, त्यांमध्ये वनस्पतींची गणना केली आहे. त्यांना 'वनस्पतिकायिक' जीव असे संबोधले आहे. 'आचारांग', 'सूत्रकृतांग', 'भगवती' आणि 'प्रज्ञापना' या अर्धमागधी ग्रंथांमध्ये वेगवेगळ्या दृष्टिकोणातून वनस्पतींचा विस्ताराने विचार केलेला दिसतो. वनस्पतींना असलेले स्पर्शेंद्रिय, त्यांची उत्पत्तिस्थाने, चेतनत्व, वनस्पतींचे लिंग, आहार, वनस्पतींचा आपल्या आहारात व औषधात उपयोग, त्यांची शरीराकृती, श्वासोच्छ्वास, आयुष्य इ. सर्व प्रकारचा विचार त्यात येतो.

आचारांगाचा प्रथम खंड सर्वाधिक प्राचीन असून, साक्षात् महावीरवाणीचे बरेच अंश त्यात प्रमाणित स्वरूपात उपलब्ध आहेत – असे अभ्यासकांचे मत आहे. हे मत ग्राह्य मानले तर आचारांगातील वनस्पतिविषयक विचारही इसवी सनापूर्वीच्या सहाव्या शतकातील आहेत. त्या वाक्यांचा अनुवाद येथे देत आहे.

''मनुष्य जन्मतो. वनस्पतीही जन्मते. मनुष्य वाढतो. वनस्पतीही वाढते. दोन्ही चैतन्ययुक्त आहेत. छेदन–भेदन केल्यावर दोन्हीही 'म्लान' होतात. मनुष्य आहार करतो. वनस्पतीही करते. दोन्हीही अनित्य आणि अशाश्वत आहेत. मनुष्यामध्ये जशी चयापचय प्रक्रिया असते, तशीच वनस्पतीतही असते. मनुष्याप्रमाणेच वनस्पतीलाही सुख–दुःख संवेदना, निद्रा, इच्छा, रोग ह्या अवस्था असतात. शस्त्राघाताच्या मंद–तीव्रतेनुसार दोघेही जखमी, मूर्च्छित अथवा मृत होतात.''

डॉ. जगदीशचंद्र बसु आणि त्यानंतरचे वनस्पतिशास्त्रज्ञ, अनेक अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी काढलेले निष्कर्ष आणि वरील वर्णन यातील साम्य खरोखरच विस्मयजनक नाही का ? जैन शास्त्रातील काही तथ्ये मात्र आजपर्यंत विकसित वनस्पति–विज्ञानाशी मेळ खात नाहीत, हेही नमूद करावेसे वाटते.

**********

## १४. वनस्पतींची इंद्रिये : महाभारत व जैनशास्त्र

महाभारत हा महाकाय ग्रंथ समकालीन ज्ञान–विज्ञानाचा कोश मानला जातो. त्यामधील शांतिपर्वाच्या १८४ व्या अध्यायात 'भृगु मुनि' आणि 'भारद्वाज' यांच्यातील वनस्पतिविषयक संवाद प्रस्तुत केला आहे. भारद्वाजांच्या मते वृक्ष हे पांचभौतिक नाहीत व इंद्रिययुक्तही नाहीत. भृगूंना हे मत अजिबात मान्य नाही. त्यांच्या मते वृक्ष पांचभौतिक आहेत आणि सेंद्रियही आहेत.

भृगूंच्या मताचा सारांश असा आहे – ''वृक्ष हे उष्णतेने म्लान होतात, त्यांची साल सुकते, फळे–फुले पिकून गळतात म्हणून त्यांना 'स्पर्शसंवेदन' आहे. वादळ, वडवाग्नी आणि वीज पडणे यांच्या ध्वनींनी ते घाबरतात, फळे–फुले पडतात म्हणून त्यांना 'श्रवणेंद्रिय' आहे. वृक्ष, लता वाढताना आपापले उचित मार्ग निवडतात. म्हणून ते 'पहू' शकतात. सुगंध, दुर्गंध, धूप इ. नी वृक्ष रोगरहित होतात, बहरतात म्हणून त्यांना 'घ्राणेंद्रिय' आहे. मुळांद्वारे वृक्ष पाणी शोषून घेतात, रोगरहित होतात म्हणून त्यांना 'रसनेंद्रिय' आहे. वृक्ष हे पाणी शोषून, उष्णता व वायूंच्यामदतीने पचनक्रिया करतात, वाढतात. वृक्ष हे सचेतन आहेत.''

जैन मान्यतेनुसार वनस्पतिकायिक जीवांना फक्त स्पर्शेंद्रिय आहे. स्पर्शेंद्रिय (त्वचा) सोडून चार इंद्रिये व मन ही प्रत्यक्ष द्रव्यरूपाने उपस्थित नसली तरी त्यांच्या शक्ती भावरूपाने वनस्पतींमध्ये असतात.

वैज्ञानिक दृष्टीने वनस्पतींना, इंद्रियधारी जीवांप्रमाणे स्पष्ट स्वरूपात एकही इंद्रिय नसते. सर्व कार्ये वनस्पती आपल्या त्वचेमार्फतच करतात. ज्या इंद्रियसंवेदना वनस्पतीत आढळतात त्यांच्या मागे विचारशक्ती, मन अथवा मज्जासंस्था नसते. वनस्पतींमध्ये अनेक प्रतिक्षिप्त क्रिया दिसतात. त्या केवळ रासायनिक किंवा संप्रेरकात्मक असतात.

अनेक इंद्रियांच्या संवेदना आपल्याला वनस्पतींमध्ये जाणवत असल्या तरी त्यांची 'त्वचा' मुख्य असल्याने जैन शास्त्राने त्यांना 'एकेंद्रिय' म्हटले आहे.

**********

## १५. मूलद्रव्ये

आधुनिक पदार्थविज्ञान व रसायनशास्त्रात मूलद्रव्यांची (एलिमेंटस्) संख्या आत्तापर्यंतच्या संशोधनानुसार ११४ आहे. भौतिकशास्त्र व रसायनशास्त्रात जसजशी प्रगती झाली तसतशी मूलद्रव्यांच्या संख्येत भर पडत गेली. त्या मूलद्रव्यांना (ओ, एच्, सी, एयू, एन्ए) अशा प्रतीकात्मक संज्ञा आहेत.

जैन शास्त्रात पुद्‌गल, स्कन्ध, अणु व परमाणु हे शब्द वारंवार वापरलेले दिसतात. 'पुद्‌गल' हे सृष्टीचे कारणद्रव्य आहे. ते 'स्कन्ध' म्हणजे समुदाय रूपात आल्यावरच दिसू लागतात. 'अणु' व 'परमाणु' हे शब्द आधुनिक परिभाषेत वेगवेगळ्या अर्थाने वापरले जातात. जैन शास्त्रात पदार्थाच्या लहानात लहान अविभाज्य कणाला अणु अथवा परमाणु या दोन्ही शब्दांनी संबोधले आहे. बहुधा ते ॲटम या अर्थाने असावेत. अणूच्या अतर्गत रचनेविषयी हा विचार नसावा. अणूंवर रहाणाऱ्या गुणधर्मांवरून जैन शास्त्रकारांनी मूलद्रव्यांची गणना केली असावी.

प्रत्येक अणूवर **(१)** उष्ण व शीत यापैकी एक स्पर्श **(२)** स्निग्ध व रुक्ष पैकी एक स्पर्श **(३)** पाच पैकी एक रस **(४)** दोन पैकी एक गंध आणि **(५)** पाचपैकी एक वर्ण रहातो.

परम्युटेशनच्या नियमाने २x२x५x२x५ = २०० प्रकारचे अणू अथवा परमाणू आहेत. प्रत्येक दुसऱ्याहून भिन्न आहे. याचा अर्थ आधुनिक भाषेत, जैन शास्त्रानुसार मूलद्रव्यांची (एलिमेंटस्) ची संख्या २०० आहे. मूलद्रव्यांची वाढती संख्या लक्षात घेता कदाचित् भविष्यकाळात मूलद्रव्यांची संख्या २०० होऊ शकेल.

निरीक्षण, चिंतन आणि आध्यात्मिक सामर्थ्य ह्या तीन माध्यमांच्या सहाय्याने सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी नोंदविलेले हे निष्कर्ष आहेत. प्राचीन भारतीय अणुविज्ञानाचे जनक 'महर्षि कणाद' यांनी वैशेषिक दर्शनात नोंदविलेल्या निष्कर्षापेक्षा हे वेगळे आहेत. भौतिकी व रसायनशास्त्रज्ञांनी याची अधिक चिकित्सा करणे अत्यंत आवश्यक आहे.

जैन शास्त्रात निर्दिष्ट एकूण ८ स्पर्श, ५ रस, २ गंध व ५ वर्ण यांचीही अधिक चिकित्सा व्हावयास हवी.

**********

## १६. शब्द अथवा ध्वनीचे स्वरूप

वैदिक परंपरेतील 'तर्कसंग्रह' नावाच्या ग्रंथात 'शब्द' (ध्वनि) हा आकाशाचा 'गुण' मानला आहे. न्यायदर्शनातील सूत्रानुसार श्रोत्रेंद्रिय (कान) हे आकाशस्वरूप आहे. दोन वस्तूंच्या घात-प्रतिघाताने 'शब्द' निर्माण होतो. निर्माण झालेला शब्द आपले प्रतिरूप संतान निर्माण करत करत श्रोत्रेंद्रिय अर्थात् कानापर्यंत पोहोचतो. शब्दज्ञानासाठी श्रोत्रेंद्रिय व शब्द यांचा संपर्क (संनिकर्ष) आवश्यक आहे. मात्र शब्द हा अनित्य आहे.

जैन शास्त्रानुसार 'शब्द' हा आकाशाचा गुण नाही आणि श्रोत्रेंद्रिय (कान) हे आकाशस्वरूपही नाही. प्रत्येक इंद्रियाला पूर्णता देणाऱ्या ज्या 'इंद्रियपर्याप्ति' आहेत त्या पूर्वकर्मांच्या आधीन आहेत. त्यानुसारच इंद्रियांचे बाह्याकार व इंद्रियशक्ती ठरतात.

जैन मतानुसार, शब्द (ध्वनि, साउंड) हा पौद्‌गलिक (सूक्ष्म परमाणूंचा संघातरूप) आहे. परमाणू हे नित्य असल्याने शब्दही नित्य आहे. अर्थात् त्यात कमी-अधिक अवस्थांतरे (परिणमन) होत असतात. आकाशाचा मुख्य गुण 'अवकाश देणे' हा आहे. ध्वनीचा बोध होण्यासाठी आकाशाची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच वायूची सुद्धा आहे. कारण ध्वनीच्या लहरी वायूतून पसरत कानापर्यंत पोहोचतात.

**(१)** सजीवाच्या प्रयत्नाने उत्पन्न झालेला शब्द, **(२)** दोन निर्जीवांच्या घात-प्रतिघाताने झालेला शब्द आणि **(३)** सजीव-निर्जीवाच्या संपर्कातून-आघातातून निर्माण झालेला शब्द - असे शब्दांचे तीन प्रकार जैन ग्रंथात येतात.

आज आपल्याला असे दिसते की अतिदूर ठिकाणी निर्माण झालेला शब्द विशिष्ट वैज्ञानिक उपकरणांच्या मदतीने आपल्याला पकडता येतो व ऐकता येतो. याचाच अर्थ असा की ध्वनीला पौद्‌गलिक वर्गणांच्या स्वरूपात मानण्याचा जैन शास्त्रकारांचा विचार अधिक विज्ञानानुकूल आहे. पदार्थविज्ञानाचे अभ्यासक यावर अधिक प्रकाश टाकू शकतील.

**********

## १७. 'जीव' तत्त्वाकडे पहाण्याचे दृष्टीकोन

वैदिक परंपरेतील बहुतांशी विचारवंतांनी (दार्शनिकांनी) आत्मा, जीवात्मा व परमात्मा या संज्ञांचा ऊहापोह केलेला दिसतो. 'जैन ग्रंथांमध्ये यांचा विचार आहे का ?' – याचे उत्तर एका दृष्टीने होकारार्थी द्यावे लागते. तरीही यांमधील चेतनत्वाला केंद्रस्थानी ठेवून तत्त्व किंवा पदार्थगणनेमध्ये 'जीव' अशीच संज्ञा येते. एक चेतन–तत्त्व संदर्भानुसार आत्मा, जीवात्मा अथवा परमात्मा असे संबोधले जाते.

या सृष्टीत असे 'जीव' म्हणजे इंडिव्हिज्युअल सोल्स किती आहेत ? याचे उत्तर आहे 'अनंत जीव आहेत'. जीवाचे मुख्य लक्षण कोणते ? 'चेतना' म्हणजे कॉन्शस्नेस. त्याला पारिभाषिक शब्द आहे 'उपयोग'. उपयोग दोन प्रकारे कार्यरत आहेत. 'जाणीव' आणि 'बोध' (ज्ञान). या इंडिव्हिज्युअल सोल्स च्या व्यतिरिक्त दुसरा कोणी मोठा, महान्, सर्वव्यापी, वैशिष्ट्यपूर्ण असा 'परमात्मा' नाही. जीव हे कोणा एका परमात्म्याचे अंश अथवा प्रतिबिंबेही नाहीत. कोणतेही दोन जीव तंतोतंत एकदुसऱ्यासारखे नाहीत. विज्ञानानुसारही प्रत्येक सजीवाचा डीएन्ए वेगवेगळा असतो.

वेगवेगळे दृष्टिकोण अथवा भूमिका ठेवल्यास जीवांचे वेगवेगळे वर्गीकरण करता येते.

मोक्षाच्या दृष्टीने जीवांचे गट दोन – १) संसारी २) मुक्त
मनाच्या दृष्टीने – १) मनसहित २) मनरहित
मर्जीनुसार हालचाल करण्याच्या दृष्टीने – १) त्रस २) स्थावर
इन्द्रियांच्या दृष्टीने – एकेन्द्रिय ते पंचेंद्रिय
जन्माच्या दृष्टीने – १) सम्मूर्च्छन २) गर्भ ३) उपपात
गर्भाच्या दृष्टीने – १) जरायुज २) अण्डज ३) पोतज
शरीरांच्या दृष्टीने – औदारिक इ. पाच
लिंगांच्या दृष्टीने – १) पुंलिंगी २) स्त्रीलिंगी ३) नपुसंकलिंगी
गतींच्या दृष्टीने – १) देव २) मनुष्य ३) नरक ४) तिर्यंच (पशु, पक्षी, कीटक इ.)

विशिष्ट दृष्टिकोण आणि तलग्राही सूक्ष्मता ही जैन शास्त्राची वैशिष्ट्ये, वर दिलेल्या एका नमुन्यातूनही स्पष्ट दिसतात.

**********

## १८. देवगति : चार गतीतील एक

स्वर्ग आणि नरक या दोन संकल्पनांमधून जगातला एकही धर्म सुटू शकलेला नाही. हिंदू, जैन, बौद्ध, शीख, मुस्लीम, ख्रिश्चन आणि इतरही धर्मात पुण्यप्रकर्षाने मिळणारा स्वर्ग आणि पापाचरणाने मिळणारा नरक यांची कमीजास्त प्रमाणात वर्णने येतातच. भारतातले 'चार्वाक' मात्र हे दोन्ही सतत नाकारत राहिले. त्यांना त्यावेळी फारसे अनुयायी मिळाले नसावेत कारण त्यांचे 'दर्शन' स्वतंत्ररूपाने विकसित झालेले दिसत नाही.

सत्यान्वेषी, बऱ्याच प्रमाणात विज्ञाननिष्ठ, विविध दृष्टींचा समन्वय करणाऱ्या व सूक्ष्म अशा जैन शास्त्रातही स्वर्ग आणि नरक यांची सविस्तर वर्णने येतात. देवांचे मुख्य चार निकाय (समूह), त्या प्रत्येकांचे क्रमाने दहा,आठ, पाच आणि बारा उपप्रकार, त्या प्रत्येकांचे इन्द्र, देवांची स्थिति, आहार, वेदना, प्रभाव, सुख, द्युति, आयुष्य इ. वर्णनांनी स्वर्गसृष्टी चांगलीच सजली आहे.

इतर स्वर्गप्रेमींपेक्षा येथे जाणवलेली एक वेगळी गोष्ट म्हणजे विविध प्रकारच्या देवांना निश्चित आयुष्य आहे. कितीही प्रदीर्घ आयुष्य असले तरी ते संपल्यावर त्यांना अन्य गतीत जावे लागणार आहे. या अर्थाने जशी मनुष्ययोनी, तिर्यंचयोनी तशीच एक देवयोनी अथवा देवगती आहे.

हिंदू पुराणांमध्ये ब्रह्मा, विष्णु, महेश तसेच गणपति, कार्तिकेय, इन्द्र इ. देवतांना अन्य गतीत जावे लागणार असल्याचे संदर्भ मिळत नाहीत. जैन आचारात या स्वर्गीय देवदेवतांना सर्वोच्च पूजनीयतेचे स्थान दिलेले नाही. आध्यात्मिक दृष्ट्या अतिप्रगत मानवी जीवच सर्वोच्च पूज्यस्थानी आहेत. किंबहुना तीर्थंकरांचा जन्म, दीक्षा इ. विशेष प्रसंगी स्वर्गातील देवदेवता पृथ्वीवर उतरतात. त्यांची वंदनभक्ती करतात.

'आत्म्याचे अंतिम प्राप्तव्य जो मोक्ष, तो मात्र फक्त मनुष्य जन्मातूनच मिळणार आहे' – याबाबत हिंदू आणि जैन यांचे एकमत आहे.

**********

## १९. जीवांचा भ्रमणवृत्तांत

जैन व हिंदू दोन्ही विचारधारात 'योनींची' म्हणजे वेगवेगळ्या स्पेसीज्‌ची संख्या ८४ लाख सांगितली आहे. '८४ लक्षांचा फेरा' ही संकल्पना भारतभरातील संतसाहित्यात व्यक्त झालेली दिसते.

इ.सनाच्या पहिल्या–दुसऱ्या शतकात आंध्रप्रदेशात 'कुन्दकुन्द' नावाचे प्रख्यात दिगंबर आचार्य होऊन गेले. 'द्वादश (१२) अनुप्रेक्षा ' हा त्यांचा एक प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्यामध्ये चिंतनासाठी १२ मुद्दे दिले आहेत. बारांपैकीएक आहे 'संसार–अनुप्रेक्षा'. हा ग्रंथ 'शौरसेनी' प्राकृतात आहे. त्यामध्ये त्यांनी प्रत्येक जीवाचा (इंडिव्हिज्युअल सोल) दिलेला भ्रमणवृत्तांत असा आहे –

**१)** अनंत–अनंत भवभ्रमणात मी (इंडिव्हिज्युअल सोल) सर्व पुद्‌गलांना (परमाणू–संघातांना) स्पर्श करून भोगले आहे. हे मी अनेकदा केले आहे. एकही पुद्‌गल अ–स्पर्श राहिलेला नाही. हाच माझा 'पुद्‌गलसंसार' !

**२)** लहान–मोठ्या आकाराची शरीरे धारण करून मी त्रैलोक्यातील सर्व क्षेत्रांमध्ये जन्मलो अगर मृत झालो आहे. एकही 'क्षेत्र' (स्पेस) असे शिल्लक नाही की जेथे मी जन्म–मरण केले नाही. हाच माझा 'क्षेत्रसंसार' !

**३)** 'काला'चा (टाइम) अत्यंत सूक्ष्म भाग म्हणजे 'समय'. या सर्व समयांच्या 'पंक्तीमध्ये' मी अनंत वेळा उत्पन्न झालो व मृत झालो. हाच माझा 'कालसंसार' !

**४)** नरक, तिर्यंच, देव व मनुष्य या चारही गतीत जाऊन मी अत्यंत अल्प अथवा प्रदीर्घ आयुष्ये भोगली आहेत. हाच माझा 'भवसंसार' !

**५)** जन्मोजन्मी फिरत असताना प्रत्येक वेळी माझे 'सूक्ष्म कर्मशरीर'ही माझ्याबरोबर होते. किंबहुना कर्मशरीरानुसारच मला वर उल्लेखलेले 'संसार' प्राप्त झाले. हाच माझा 'भावसंसार' !

हे सर्व विचार मानणे अगर न मानणे हा श्रद्धेचा भाग आहे. तो क्षणभर बाजूला ठेवला तरी आपल्या 'आध्यात्मिक प्रतिभे'ने उलगडून ठेवलेला हा भ्रमणपट म्हणजे जैन विचारधारेतील जणू 'विश्वरूपदर्शन'च आहे !

**********

## २०. स्वावलंबन

‘स्वावलंबन’ आणि ‘परस्पर–सहकार्य’ हे दोन्ही नैतिक आणि सामाजिक सद्‌गुण आहेत. वरवर पहाता काहीसे परस्पर–विरोधी भासले तरी दोन्हींमागच्या भूमिका एकत्रितपणे व्यक्तिमत्व–विकासाला पूरकच ठरतात.

इतर जीवांबरोबर जगत असताना जरी ‘सहकार्य’ भावनेला महत्त्व असले तरी ‘आत्मकल्याण’ अगर ‘आध्यात्मिक प्रगती’साठी मात्र जैन शास्त्र संपूर्ण स्वावलंबनाचा अगर स्वयंपूर्णतेचा आदेश देते.

या पूर्वीच्या लेखात पाहिल्याप्रमाणे प्रत्येक जीव (इंडिव्हिज्युअल सोल)स्वतंत्र आहे. कर्मांच्या योगाने विशिष्ट मानवी जीव कुटुंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा अथवा विश्वाचा घटक असला तरी पारमार्थिक दृष्टीने तो ‘एकटा’ आहे. त्याच्या प्रत्येक चांगल्या वाईट कर्मांचा कर्ता व भोक्ता तोच आहे. स्वत:च्या उन्नतीला अथवा पतनाला तोच जबाबदार आहे. त्याच्यामधील ‘चेतना’ अनंत ज्ञान, सामर्थ्य, सौख्य इ. गुणांनी परिपूर्ण आहे. मानवी योनी सोडून इतर योनींमध्ये कर्मफलांच्या भोगाला महत्त्व असले तरी मानव संपूर्णपणे ‘कर्मपरतंत्र’ अगर ‘कर्माच्या हातचे बाहुले’ नाही. जैन शास्त्रानुसार ‘पुरुषार्थ’ म्हणजे – कर्मांवर (दैव, नियती, नशीब, भोग) मात करून नैतिक व आध्यात्मिक उन्नती करणे. आत्मकल्याण अगर आत्मसाक्षात्कार कधीही ‘सामुदायिक’ नसतो. ती एकट्याचीच तपस्या असते. गुरू फक्त मार्गदर्शक असतात.

‘अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच:’ हे श्रीकृष्णवचन आत्मकल्याणाच्या बाबतीत लागू पडत नाही.

जैन परिभाषेत ‘परस्पर सहकार्य’ भावनेला व्यवहार–नयाच्या दृष्टीने महत्त्व आहे तर ‘स्वावलंबन’ हे निश्चय–नयानुसार आत्मकल्याणकारक ठरते.

***********

## २१. पथप्रदर्शक शास्त्र

आत्मोन्नतीची इच्छा असणाऱ्या व्यक्तीला तीर्थंकर अगर आचार्य कशा प्रकारे मदत करू शकतात ? ‘ते आपल्याबरोबर कोणाला मोक्षाला नेऊ शकतात का ?’ – याचे उत्तर अर्थातच नकारार्थी आहे. ते ज्या वाटेने गेले तो ‘पथ’ अर्थात् ‘मार्ग’ तेवढा ते दाखवितात. कालच्या लेखात म्हटल्याप्रमाणे मार्गक्रमणा मात्र ‘एकट्या’लाच करावी लागते. भ. महावीरांच्या चिंतनात ‘एस णेयाउए मग्गे’ असा उल्लेख वारंवार येतो. या पदावलीचा अर्थ ‘नीतिसंपन्न’ , ‘न्याय्य अर्थात् तर्कसंगत’ अथवा ‘तरून गेलेल्यांचा मार्ग’ अशा विविध प्रकारे करतात. एक मात्र नक्की आहे की जैन शास्त्रात ‘पथप्रदर्शन’ महत्त्वाचे आहे.

‘ज्ञानमार्गाने जा’ अथवा ‘भक्तिमार्गाने जा’ अथवा ‘कर्ममार्गाने जा’ असे मार्गांचे विविध विकल्प (ऑप्शन्स) जैन शास्त्र सुचवीत नाही. मोक्षमार्ग एकच आहे. आरंभी या शास्त्राची ‘शाब्दिक माहिती’ (इन्फर्मेशन) करून घ्यावी. ती करून घेत असताना त्यातील तत्त्व चिंतनावर ‘श्रद्धा’ उत्पन्न होईल. या दोन्हीबाबत ‘गुरु’ सहायक ठरतील अथवा स्वचिंतनातूनही ती निर्माण होईल. श्रद्धा ‘सम्यक्’ म्हणजे उचित प्रकारे दृढ झाली की आधीचे माहितीवजा ज्ञानही ‘सम्यक्’ होईल. जे वाचले, माहिती करून घेतले व श्रद्धा ठेवली, त्याला प्रत्यक्ष व्यवहारात तंतोतंत उतरवीत गेले पाहिजे. वैज्ञानिक प्रयोगात थिअरीबरोबर प्रॅक्टीकलला जितके महत्त्व आहे तितकेच अध्यात्मात ज्ञानाबरोबर ‘आचरणा’चे महत्त्व आहे. अहिंसा, संयम आणि तप हे आचरणाचे आधारस्तंभ आहेत.

ज्ञान, श्रद्धा व आचरण हे तीन स्वतंत्र धागे नाहीत. त्यांचाही एकमेकांच्या मदतीने गोफ विणला जातो. मगच जैन तत्त्वज्ञानातील सूत्र बनते – ‘सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग: ।’

**********

## २२. निरर्थक हालचाली

मनाच्या, वाचेच्या आणि शरीराच्या कोणत्याही स्थूल अगर सूक्ष्म हालचालींना जैन परिभाषेत 'योग' म्हणतात. विवेकी, विचारी मनुष्याने प्रत्येक हालचाल भान ठेवून, सावधपणे म्हणजेच 'अप्रमत्त' राहून करावी अशी अपेक्षा आहे. जैन 'श्रावक' अर्थात् गृहस्थासाठी याबाबत विशेष मार्गदर्शन केले आहे.

उपजीविकेसाठी, आरोग्यपूर्ण व आनंदी जीवन जगण्यासाठी शरीर, मन आणि वाणी सतत कार्यरत रहाणारच ! गीता सुद्धा सांगते, 'न हि कश्चित् क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत्' - जीवित व्यक्ती क्षणभरही हालचालीशिवाय राहू शकत नाही. परंतु ज्या हालचाली केल्याने स्वत:चे काहीसुद्धा प्रयोजन साधत नाही आणि इतरांना मात्र उपद्रव होतो अशा हालचालींना 'निरर्थक' (जैन परिभाषेत 'अनर्थदण्ड') म्हणतात.

बसल्याबसल्या पाय जोरजोराने हलविणे, अनावश्यक हातवारे करणे, उद्यानात बसल्यावर विनाकारण जमीन उकरणे अगर हिरवळ उपटणे, काठी हातात घेऊन दिसेल त्या वस्तूवर मारत जाणे, उगीचच फुले, पाने कुस्करणे, फुलपाखरे पकडणे, आळसाने किंवा बेफिकिरीने कचरा खिडकीतून भिरकावणे, गंमत म्हणून काड्यापेटीच्याकाड्या जाळणे, वेळ जात नाही म्हणून निंदा-चुगली (गॉसिपिंग) करणे, दारू-जुगार इ. व्यसनांच्या नादी लागणे व इतरांना लावणे, निरर्थक चाळा म्हणून काहीतरी चघळत रहाणे, थापा मारणे, पाण्याचे नळ विनाकारण चालू ठेवणे, अफवा पसरविण्यात सहभाग घेणे - अशी अक्षरश: शेकडो उदाहरणे देता येतील. हे सर्व अनर्थदंड कटाक्षाने टाळले पाहिजेत.

कॉमनसेन्सने अथवा नागरिकशास्त्राच्या अभ्यासानेही आपण ह्या सर्व गोष्टी टाळू शकतो. 'प्रमादचर्या' या शीर्षकाखाली जैन धर्माने त्याला आचारशास्त्रात स्थान देऊन लक्ष वेधून घेतले हे विशेष !

**********

## २३. हानिकारक ध्याने कोणती ?

सारे जग पतंजली मुनींच्या अष्टांगयोगातील ‘ध्याना’कडे (मेडिटेशन) ध्यान लावून बसले आहे. बौद्ध तत्त्वज्ञानातून विकसित झालेल्या ‘प्रेक्षाध्याना’च्या अभ्यासासाठी भारतामध्ये केवढा ‘स्पिरिच्युअल टूरिझम’ सुरू झाला आहे ! जैनांनी कोणत्या ध्यानांना ‘हानिकारक ध्याने’ म्हटले आहे ? जैन परिभाषेतील सु-ध्याने आणि कु-ध्याने समजावून घेऊ.

सामान्य संसारी माणूस व्यवहारात अनेक चांगल्या तसेच वाईट गोष्टीतही एकाग्र (जास्त अचूक शब्द ‘व्यग्र’) राहू शकतो. मनाच्या व्यग्र होण्याच्या शक्तीचे सामर्थ्य जेव्हा सांसारिक चिंतनासाठी वापरले जाते तेव्हा ते ‘आर्तध्यान’ असते. पराकोटीच्या क्रूर विचारांना ‘रौद्रध्यान’ म्हटले आहे. आर्त व रौद्र ध्याने अशुभ आहेत.

**आर्तध्यान :** ‘अर्ति’ म्हणजे पीडा, दु:ख. त्यातून त्याच्याशी जे संबंधित ते ‘आर्त’.

**१)** अनिष्ट गोष्ट प्राप्त झाल्यावर व्याकुळ होऊन त्यापासून दूर जाण्याची चिंता.

**२)** इष्ट गोष्टीचा विरह झाल्यास तिच्या प्राप्तीची चिंता.

**३)** शारीरिक, मानसिक पीडांच्या (रोगांच्या) निवारणाची चिंता.

**४)** भोगोपभोगांची साधने मिळविण्याची तीव्र लालसा व संकल्प.

अशा आर्तध्यानात बुडून गेल्याने आपल्याच सकारात्मक चेतनाशक्तीची हानी होते. आजूबाजूच्या व्यक्ती व परिसरातही आपण त्या चिंतांची लागण करतो.

**रौद्रध्यान :** ज्याचे चित्त क्रूर व कठोर असते त्याला ‘रुद्र’ अर्थात् ‘भयंकर’ म्हटले आहे. हिंसक, घातक, नृशंस कृत्यांच्या विचारांमध्ये व नियोजनामध्ये बुडून जाणे हे ‘रौद्रध्यान’ आहे. या ध्यानाने होणारी स्वत:ची व इतरांची हानी सर्वात भीषण असते. उदा. आतंकवादी हल्ले, खुनाच्या योजना इ.

पत्नीचा विरह सहन न होऊन जेव्हा तुलसीदास ‘सर्पाच्या दोरी’ वरून ‘रत्नावली’ला भेटायला गेले तेव्हा ती उद्गारली, ‘हीच तळमळ व एकाग्रता ईश्वरदर्शनासाठी वापरली असतीत तर !’ पत्नीचे हेच उद्गार तुलसीदासांच्या जीवनात क्रांती घडविणारे ठरले. जैन परिभाषेत, तुलसीदासांचे आर्तध्यान हे धर्मध्यानात परिणत झाले.

‘धर्मध्यान’ व ‘शुक्लध्यान’ ही शुभध्याने असून ती हितकारक आहेत.

**********

## २४. वीतराग जिन

'वीत' हे विशेषण आहे. ते 'वि+इ' या क्रियापदापासून बनले आहे. 'वीतराग' ह्या शब्दाचे स्पष्टीकरण अशा प्रकारे दिले आहे – 'राग म्हणजे आसक्ती दूर निघून गेली आहे ज्यांच्यापासून अशा व्यक्ती'. बोली मराठी भाषेत, 'राग' म्हणजे 'क्रोध'. संस्कृत व प्राकृतात मात्र 'राग' म्हणजे रंगवून टाकणाऱ्या भावना अर्थात् आसक्ती.

जैन शास्त्रात 'वीतराग' शब्द तीर्थंकर, केवलज्ञानी व एकूणच निरासक्त व्यक्तींसंबंधी उपयोजितात. हाच अर्थ वेगळ्या दृष्टीने 'जिन' शब्दात अंतर्भूत आहे. अंत:करणातील सर्व विकारांना जिंकणारे, ताब्यात ठेवणारे ते 'जिन'. अशा जिनांचे अनुयायी ते जैन. आचार्य कुन्दकुन्दांनी (सुमारे इ.स. २ रे शतक) प्रथम 'जेण्ण' शब्द वापरलेला दिसतो. त्यानंतर कित्येक शतकांनी आजचा 'जैन' शब्द रूढ झाला. प्रथमपासून हा धर्म 'निर्ग्रंथ' (निग्गंठ) नावाने प्रचलित होता. (संदर्भ : पाली ग्रंथ)

जैन शास्त्रानुसार, 'कषाय' म्हणजे चित्ताला गढूळ करणारे विकार ! क्रोध, मान (अहंकार), माया (कपट, ढोंग) आणि लोभ हे चार कषाय आहेत. क्रोध व मानाचा संबंध 'रागा'शी म्हणजे आसक्तीशी आहे. माया व लोभाचा संबंध 'द्वेषा'शी आहे. म्हणजेच ४ कषाय 'राग–द्वेषा'त अंतर्भूत होतात. 'द्वेष' सुद्धा 'रागा'चेच विरुद्ध टोक आहे. त्यामुळे 'राग' शब्दात त्याचाही अंतर्भाव करता येतो. सारांश काय, 'वीतराग' शब्द वरील स्पष्टीकरणानुसार अतिशय अर्थपूर्ण आहे. वैदिक परंपरेतील काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंचा संक्षेपही याच प्रकारे 'राग' शब्दात करता येईल.

नाहं रामो न मे वाञ्छा भावेषु न च मे मन: ।
शान्त आसितुमिच्छामि स्वात्मनीव जिनो यथा ।। (योगवासिष्ठ, वैराग्य प्रकरण)

'योगवासिष्ठा'तील श्रीरामाच्या तोंडचा 'जिन' शब्द विशेष लक्षणीय आहे. दोन्ही परंपरांनी 'शान्त निरासक्त' आयुष्याला महत्त्व दिले आहे. गीतेतही २.५६ आणि ४.१० या श्लोकात 'वीतराग' शब्द आलेला आहे.

**********

## २५. शल्यचिकित्सा आणि शल्योद्धार

आज 'सर्जरी' या अर्थाने वापरण्यात येणाऱ्या 'शल्यक्रिया' शब्दाशी शीर्षकातील शब्दांचे लक्षणीय साम्य दिसते. आपल्या शरीरातील हानिकारक भाग ऑपरेशनने काढून टाकला जातो. जैन शास्त्रातही 'शल्ये दूर करण्यासंबंधी'चा विचार आहे. फक्त ही शल्ये मानसिक आहेत.

शल्यांचा संबंध 'महाव्रत' व 'अणुव्रतां'शी आहे. अहिंसा, सत्य इ. पाच व्रतांचे संपूर्णत: पालन हे 'महाव्रत'. महाव्रतांचे आंशिक किंवा यथाशक्ती पालन हे 'अणुव्रत'.

व्रते धारण करण्यापूर्वी अंत:करणाची पूर्वतयारी करावी लागते. 'शल्य' म्हणजे काटा, बोच, सल, मानसिक ठुसठुस. शल्ये दूर करणे, उखडून टाकणे म्हणजे शल्योद्धार. शल्ये तीन आहेत. माया, मिथ्या व निदान.

दंभ, कपट, ठगवृत्ती, देखावा, आडंबर, मायावीपणा यांचा लवलेश न ठेवणे हा 'मायाशल्या'चा उद्धार होय.

सत्यावर श्रद्धा, अंधश्रद्धा हटविणे, तर्कसंगत-सुसंगत बोलणे-वागणे, असत्याला कौल न देणे हा 'मिथ्याशल्या' चा उद्धार होय.

'निदानशल्या'चा उद्धार करताना भोगांची लालसा, अभिलाषा, कामना दूर ठेवावी लागते. कोणत्याही ऐहिक, प्रापंचिक लाभाच्या अपेक्षेने महाव्रते अगर अणुव्रते धारण करावयाची नसतात. यामध्ये मोक्षप्राप्तीची सुद्धा 'लालसा' ठेवणे अपेक्षित नाही. ज्ञान-दर्शन-चारित्राच्या योग्य आराधनेने तो आपोआप गवसेल.

हिंदू परंपरेत धन-धान्य, समृद्धी, आरोग्य, सौभाग्य, संतान, आयुर्वर्धन या ऐहिक सुखांच्या प्राप्तीसाठी अनेक व्रतवैकल्ये संकल्पपूर्वक केलेली दिसतात. जैन परंपरेतही 'विधिमार्गप्रपा' सारख्या ग्रंथात असे व्रतविधी दिसतात. परंतु साधु आणि श्रावक यांनी महाव्रते व अणुव्रते धारण करताना ऐहिक संकल्पपूर्तीसाठी ती धारण करू नयेत, अशी जैन शास्त्राची अपेक्षा आहे.

वर वर्णन केलेली तीन शल्ये दूर केल्यावर व्यक्तीला महाव्रते अथवा अणुव्रते धारण करण्यासाठी योग्य ती मनोभूमिका प्राप्त होते. व्रतधारणेनंतर ही शल्ये दूर ठेवण्यासाठी 'जागृत' रहावे लागते.

**********

## २६. सूडाचा प्रवास

'जैन महाराष्ट्री' नावाच्या प्राकृत भाषेत 'हरिभद्र' नावाच्या आचार्यांनी लिहिलेल्या एका विलक्षण सुंदर कादंबरीचा आपण आज परिचय करून घेणार आहोत. कादंबरीचा काळ आहे इसवी सनाचे आठवे शतक !

कादंबरीचे नाव आहे 'समरादित्यकथा' (प्राकृत : समराइच्चकहा). ही कादंबरी मराठीत अनुवादित केली तर तिला यथार्थ नाव द्यावे लागेल 'सूडाचा प्रवास'.

एक राजपुत्र आणि एक पुरोहितपुत्र यांच्या ९ जन्मांची सलग कथा ९ प्रकरणात रंगविली आहे. प्रत्येक प्रकारणाला 'भव' (जन्म) म्हटले आहेत. कथानकाला जोडून अनेक उपकथानके, आख्यायिका, संवादही आहेत. कथावस्तु उत्कंठावर्धक आणि शैली रसाळ आहे

राजपुत्र गुणसेन आणि पुरोहितपुत्र अग्निशर्मा बालपणचे सवंगडी. अग्निशर्मा अत्यंत कुरूप, बुटका. राजपुत्र त्याची वारंवार थट्टा करतो. गाढवावर बसवून धिंड काढतो. अग्निशर्माच्या मनात द्वेषाची ठिणगी पडते. राजपुत्राच्या मनात मोठेपणी पश्चात्तापाची भावना येते. तो आता राजा झालेला असतो. साधू झालेल्या अग्निशर्माची तो क्षमा मागतो व त्याला भोजनाचे निमंत्रण देतो. अत्यंत महत्त्वाच्या राजकार्यात गुंतल्याने त्याचे तीन वेळा साधूकडे दुर्लक्ष होते. अपमान जिव्हारी झोंबतो. द्वेषाने पेटलेल्या अग्निशर्मा साधूचा सूडाचा प्रवास सुरू होतो. गुणसेनाच्या सूड घेण्याच्या इच्छेने तो उग्र तपस्या करतो.

पिता-पुत्र, माता-पुत्र, सक्खे भाऊ, पति-पत्नी, चुलत भाऊ अशा अनेक नात्यांनी ते सतत पुढील आठ जन्म एकत्र येतात. प्रत्येक जन्मी अग्निशर्मा गुणसेनाचा जीव घेण्याचे प्रयत्न करतो. गुणसेन शांत समताभाव धारण करतो. परिणामी एकाला रौरव नरकगती आणि दुसऱ्याला स्वर्गप्राप्ती होते.

जैन तत्त्वज्ञानाचा कणा असलेला 'कर्मसिद्धांत' यात कथानकाच्या ओघात विस्ताराने समजाविला आहे. हरिभद्रांची बहारदार शैली, कथेचे वाङ्‌मयीन मूल्य वाढविते.

झी. टी.व्ही.च्या 'असंभव' मालिकेच्या सर्व 'फॅन्स'ना या कादंबरीबद्दल नक्कीच कुतूहल वाटेल.

**********

## २७. भावनांचे रंगतरंग

स्थळ, काळ, परिस्थिती आणि आपली शारीरिक–मानसिक स्थिती यानुसार आपल्या मनात विचारांचे व भावनांचे अनेक तरंग उसळत असतात. जैन तत्त्वज्ञानानुसार हे भाव 'मनाचे' नसून 'आत्म्याचे' आहेत. ते आत्म्याचे स्थायीभाव नसून फक्त 'पर्याय' म्हणजे सतत परिणमन होत जाणाऱ्या अवस्था आहेत.

'औदयिक' नावाचे भावतरंग अनेक आहेत. त्यापैकी क्रोध, मान (अहंकार), माया (कपट), लोभ हे चार 'कषाय' जणू आत्म्याला त्या काळापुरते गढूळ करतात. आपल्या रंगात रंगवून टाकतात. त्यांच्या प्रभावाने आपले वर्तनही रंगून निघते. त्यांना पारिभाषिक भाषेत 'लेश्या' असे म्हटले आहे.

सहा लाकूडतोडे वनात जातात. सूर्य डोक्यावर येईपर्यंत काम करतात. त्यांची शिदोरी आधीच माकडांनी पळविलेली असते. भूक भागविण्यासाठी फळांच्या झाडांचा शोध घेतात. टपोऱ्या, रसाळ जांभळांनी लदलेला वृक्ष दिसतो. जांभळे मिळविण्यासाठी ६ लोक क्रमाक्रमाने ६ उपाय उत्स्फूर्तपणे सुचवितात.

१) चला रे, चालवा कुऱ्हाडी. संपूर्ण झाड पाडू.

२) नको रे, ही एकच मोठी फांदी तोडू.

३) कशाला उगाच फांदी ? इकडच्या दोन शाखा तोडू.

४) काही गरज नाही. काही घोसच झोडपून घेऊ.

५) झोडपण्याची काय गरज ? पिकलेली जांभळे झेल्याने अलगद काढू.

६) पानांच्या ढिगावर अलगद पडलेली जांभळे सुद्धा ढीगभर आहेत. तीच खाऊ.

या भावतरंगांना जैन शास्त्रात क्रमाने कृष्ण (गडद काळा), नील (गडद निळा), कापोत (राखाडी), पीत (पिवळा), पद्म (ऑफ व्हाइट) आणि शुक्ल (शुभ्रधवल) असे म्हटले आहे.

गीतेत ज्याला सात्त्विक, राजस व तामस म्हटले आहे त्या संकल्पनेचे अधिक विश्लेषण जैन तत्त्वज्ञानात भावनांच्या रंगतरंगांच्या रूपाने परिणामकारकपणे प्रस्तुत केले आहे.

प्रत्येकाचे कषाय किती तीव्र आहेत व लेश्या किती गडद आहेत त्यावर त्याला होणारे कर्मबंध ठरत असतात. प्रत्येक कृती करताना आपले भावतरंग निरखावे अशी जैन शास्त्राची अपेक्षा आहे.

**********

## २८. समिति

‘‘समिति’’ शब्द व्यवहारात वेगवेगळ्या अर्थांनी वापरण्यात येतो. इंग्रजीतील (कमिटी) शब्दाचा भारतीय भाईबंद म्हणजे ‘समिति’. संघपरिवारात ध्येयनिष्ठ प्रचारकांच्या शिस्तबद्ध समुदायास ‘समिति’ म्हणण्याचा प्रघात आहे.

‘‘सम् + इ’’ या क्रियापदापासून बनलेल्या या नामाचे स्पष्टीकरण जैन आचारशास्त्रात अशा प्रकारे दिलेले आढळते - सम्यक् प्रकारे केलेल्या गमन-आगमन इत्यादी ५ प्रकारच्या प्रवृत्ती. या सर्व क्रिया माणसाने विचार-विवेक-पूर्वक कराव्या अशी अपेक्षा आहे. केवळ जैनांसाठीच नव्हे तर सर्वांसाठीच या खबरदारीच्या सूचना आवश्क आहेत.

**१) ईर्यासमिति :** सावधानतापूर्वक जाणे-येणे, की ज्या योगे आपल्या व दुसऱ्या (अगदी किडामुंगीच्याही) जिवाला धोका उत्पन्न होणार नाही. आधुनिक काळात चालत अगर वाहन चालवत असताना मोबाइलवर न बोलणे, गाडी चालवताना वेगावर ताबा ठेवणे, शक्यतो पब्लिक व्हेइकलने जाणे, ‘कार-पूल’ करून जाणे, अपरात्री प्रवास टाळणे असे कितीतरी प्रकार ‘ईर्या-समिती’चे होऊ शकतात.

**२) भाषासमिति :** सत्य, हितकारी, परिमित आणि संदेहरहित बोलणे ही ‘भाषासमिती’ होय. ‘सनसनीखेज ब्रेकिंग न्यूज’ अनेकदा या समितीच्या उल्लंघनाचीच उदाहरणे असतात. निंदा, चुगली, अफवा इ. टाळणे आणि प्रसंगी मौन पाळणे हेच उत्तम.

**३) एषणासमिति :** जीवननिर्वाहासाठी निर्दोष साधनांनी कमाई करणे ही एषणासमिती होय. घातक व्यवसायातून मिळविलेली अफाट संपत्ती धार्मिक निकषांवर त्याज्यच ठरते.

**४) आदाननिक्षेपसमिति :** कोणत्याही गोष्टी उचलताना व ठेवताना आदळआपट न करणे हे ह्या समिती स्वरूप आहे. तसे केल्याने अहिंसापालन तर होतेच पण वस्तूही नीट जागच्या जागी मिळतात.

**५) उत्सर्गसमिति :** निरुपयोगी वस्तूंची विल्हेवाट लावताना इतर व्यक्तींची व पर्यावरणाची हानी न हाईल याकडे लक्ष ठेवणे ही उत्सर्गसमिति होय.

कर्मांचे बंध कमी करण्याचे हे उपाय अत्यंत व्यवहारोपयोगी आहेत. मात्र ‘वाचायला’ सोपे आणि ‘वागायला’ चांगलेच अवघड आहेत.

**********

## २९. दैनंदिन जीवनात हिंसा–अहिंसा

अहिंसेची संक्षिप्त, संपूर्ण व्याख्या करणे कठिण आहे. ‘अहिंसा’ या पदातच नकार समाविष्ट आहे. त्यामुळे आपोआपोच ‘हिंसा न करणे म्हणजे अहिंसा’ अशी व्याख्या तयार होते. ‘कायेने, वाचेने अथवा मनाने स्वत:ला किंवा दुसऱ्याला दुखापत, इजा न करणे’ ही, अहिंसा शब्दाच्या स्पष्टीकरणाची पहिली पायरी आहे. ‘असा घात किंवा इजा स्वत: न करणे, दुसऱ्याकडून न करविणे आणि करणाऱ्यास अनुमोदन न देणे’, ही स्पष्टीकरणाची दुसरी पायरी आहे. ३ X ३ = ९ प्रकारे हिंसेचा आजीवन त्याग हे ‘महाव्रत’ आहे.

जैन श्रावकाला (अथवा कोणत्याही गृहस्थाला) दैनंदिन जीवनात संपूर्ण अहिंसापालन अशक्यप्राय आहे.

शेती करून धान्य पिकविणे, स्वयंपाक–स्वच्छता इ. करणे, घर बांधणे, मंदिर बांधणे इ. क्रिया करताना ‘स्थावर’ जीवांची व काही प्रमाणात ‘त्रस’ जीवांची हिंसा होणारच. त्या जीवांविषयी करुणाभाव ठेवून आणि खबरदारी घेऊन झालेली हिंसा ‘**आरंभी हिंसा**’ होय. द्रव्योपार्जनासाठी ‘उद्यम’ आवश्यक आहे. साधनशुचिता ठेवून आणि सत्यपालन करूनही झालेली अनिवार्य हिंसा ‘**उद्यमी हिंसा**’ होय. अमानुष हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी प्रतिहल्ला अगर क्वचित वधही करावा लागेल. ही ‘**विरोधी हिंसा**’ होय. दैनंदिन जीवनात या तीनही हिंसा टाळता येत नाहीत.

कोणत्याही निरपराध प्राण्याची जाणूनबुजून केलेली हिंसा ‘**संकल्पी हिंसा**’ आहे. ती गृहस्थासाठी सर्वथा त्याज्य मानली आहे.

आचारांगात आणि एकूणच जैन शास्त्रात ‘हिंसा’ शब्दासाठी ‘आरंभ’ आणि ‘समारंभ’ शब्द येतात. गीतेत चौथ्या अध्यायात ‘पण्डिता’चे लक्षण देताना म्हटले आहे – ‘यस्य सर्वे समारम्भा: कामसंकल्पवर्जिता: ।’ तसेच बाराव्या अध्यायात कृष्ण म्हणतो – ‘सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्त: स मे प्रिय: ।’

‘आरंभ’, ‘समारंभ’ या जैन पारिभाषिक शब्दांचा गीतेतील वापर हा खासच लक्षणीय आहे !!

**********

## ३०. शांततामय सहजीवन

कोणतीही संवेदनाशील, विचारी आणि पक्षपातरहित व्यक्ती जगाच्या शांततामय सहजीवनाचीच इच्छा करते. भारतातील प्रभावी विचारवंतांनी सतत आपापल्या परीने अहिंसेचे महत्त्व आविष्कृत केले आहे. भ. पतंजलींनी अहिंसेला ‘यम’(संयम) अथवा ‘महव्रत’ म्हटले आहे. भ. बुद्ध ‘परमकारुणिक’ विशेषणाने संबोधित केले जातात.

जैन शास्त्राची आधारशिलाच अहिंसा आहे. किंबहुना जैन धर्माचे पर्यायी नावच ‘अहिंसाधर्म’ आहे. साधूंसाठीच नव्हे तर श्रावकांसाठी (गृहस्थांसाठी)ही त्यांनी ‘यथाशक्ति अहिंसापालना’वर आधारित आचार ठरविला. हिंडणे-फिरणे, बोलणे, स्वयंपाक-स्वच्छता इ. गृहकृत्ये, उपजीविकेची साधने, धर्मकृत्ये, आहारपान, विरोधकांशीसामना, रोग प्रतिकार, वैचारिक उदारता आणि अखेर समाधिमरण - येथपर्यंत अहिंसाभावनेचे ठिबकसिंचन केले. विचारातील अहिंसा दैनंदिन आचरणात आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला. आहाराची हिंसा अहिंसेच्या दृष्टीने अतिशय सूक्ष्मतेने चिकित्सा केली.

‘आचारांग’ ग्रंथ जणू अहिंसेची अष्टाध्यायीच आहे. त्यातील सूत्रमय अर्धमागधी शब्दांना लयबद्धता आणि आध्यात्मिक अनुभूतींचा ‘परतत्त्वस्पर्श’ आहे. अहिंसेचे हे प्राचीनतम उपनिषद आहे.

सुमारे ११ व्या शतकात होऊन गेलेल्या ‘अमृतचन्द्र’ नावाच्या आचार्यांचा, अभिजात संस्कृतातील शैलीदार ग्रंथ आहे - ‘पुरुषार्थ-सिद्धि-उपाय’. अहिंसेच्या सूक्ष्मतर-सूक्ष्मतम विवेचनाचा तो जणू कळसाध्याय आहे.

या लेखमालेत, या दोन्ही ग्रंथांतील वेचक विचारांचा वेध घेणार आहोत. त्यातील विचारांचे सार असे की, अनेक दुष्प्रवृत्तींनी भरलेल्या जगाला कोणता ‘वीर’ काबूत आणू शकेल ? ‘शस्त्राचा प्रतिकार शस्त्राने’ केला तर ही साखळी तुटणारच नाही. म्हणून हिंसेचा सामना करण्यासाठी ‘अहिंसे’ला पर्यायच नाही. प्रश्न असा आहे की, पुन्हा नवा ‘बुद्ध’ किंवा ‘महावीर’ होण्याची वाट बघायची की शांतताप्रेमी बुद्धिमंतांनी संघटितपणे वीरशक्ती प्रकट करायची ? आता यक्षप्रश्न तारणहारांचा नाही तर अगदी तुमचा-आमचा आहे !!!

**********

## ३१. अहिंसेचा मूलगामी विचार आणि आचार

'आचारांग' हा अर्धमागधी ग्रंथ आपल्या आठ अध्यायातून (अध्ययनातून) हिंसा-अहिंसेकडे बघण्याचा एक वेगळाच दृष्टिकोण देतो.

**१) शस्त्रपरिज्ञा :** पृथ्वी, जल इ. एकेंद्रिय जीव आणि इतर त्रस प्राण्यांना आपल्या कोणकोणत्या हालचाली 'शस्त्रवत्' ठरतात याचा ऊहापोह. हिंसेसाठी-आरंभ, समारंभ, दंड, छण आणि विहिंसा या शब्दांचा उपयोग. सहा प्रकारच्या जीव-समूहांना 'अभय' देण्यासाठी 'परिज्ञा' म्हणजे विवेकाची आवश्यकता. हे तीन प्रमुख मुद्दे त्यात येतात.

**२) लोकविजय :** सामान्य माणूस व गुन्हेगार, पैसा व सुखोपभोगासाठी जो 'परिग्रह' करतो त्यामध्ये हिंसादोष उत्पन्न होतात. अपरिग्रह म्हणजे आसक्तीवरील विजय हाच श्रेष्ठ विजय होय.

**३) शीतोष्णीय :** 'हिंसा' स्वत:च 'शस्त्र' आहे. शस्त्रप्रयोगाने शस्त्रप्रयोग वाढतात. मैत्री व क्षमा ही 'अशस्त्रे' आहेत. कुशल व्यक्ती शस्त्रप्रतिकार 'नि:शस्त्रा'ने करते.

**४) सम्यक्त्व :** स्वत:ला व इतरांना जाचक बंधने घालणे, अधिकार गाजवणे, दास बनविणे, शरीर-मनास छळणे - अशा हिंसेपासून दूर राहण्याचा सल्ला, या अध्ययनात दिला आहे.

**५) लोकसार :** कामभावना, मोह व परिग्रह हिंसेशीच जोडलेले आहेत. ती हिंसा व त्यामुळे होणारे कर्मबंध टाळण्याचे उपाय या अध्ययनात येतात.

**६) धूत :** अहिंसा व सत्याच्या ५ कसोट्या येथे दिल्या आहेत. त्यातून अहिंसा पालनाचे व्यावहारिक मार्गदर्शन मिळते. त्या कसोट्या अशा - पक्षपात न करणे, विचारी दृष्टिकोण, सर्व जीवांशी मैत्री, शास्त्रज्ञान आणि स्वीकृत तत्त्वांशी निष्ठा.

**७) विमोक्ष :** अहिंसेशी सुसंगत असा मुनींचा आहार-विहार आणि समाधिमरण.

८) महावीरांच्या तपस्येचे वर्णन.

तात्पर्य असे की 'अहिंसा' हे मूलगामी व्रत आहे. सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य व अपरिग्रह ही केवळ दिग्दर्शनार्थ दिलेली भिन्न भिन्न नावे आहेत. अहिंसापालनाचे ठोक नियम नाहीत. व्यवहारात द्रव्य, क्षेत्र, काळ व भाव यांचा विवेक ठेऊनच अहिंसा पाळावी लागते.

**********

## ३२. हिंसेचे कमी–अधिक फळ

‘अमृतचन्द्र’ आचार्यांनी हिंसक, हिंस्य, हिंसा आणि हिंसाफल यांचे जे सूक्ष्म वर्णन केले आहे, त्याचे ‘सार’ आज समजून घेऊ.

दुसऱ्याविषयी राग–द्वेष इ. विकार मनात उद्भवले की ‘भावहिंसे’ला आरंभ होतो. आपल्या शुद्ध आत्मस्वरूपाचा त्याने घात होतो. दुसऱ्याच्या घातापेक्षा ‘भावहिंसा’, आपलेच नुकसान अधिक करते. खूप काळजी घेऊनही किडा, मुंगी, ढेकूण इ. चिरडले गेले तर हिंसादोष नाही. तेथे ‘द्रव्यहिंसा’ (शारीरिक हिंसा) आहे पण ‘भावहिंसा’ नाही.

१) लुटारू रात्रभर टपून बसला. वाटसरू आलाच नाही. मनातील हिंसाभावामुळे प्रत्यक्ष हिंसा न करताही लुटारूला हिंसादोष लागतो.

२) कोणाला खूप यातना देण्याचे मनात आहे. काही कारणाने देता आल्या नाहीत. ‘बघून घेईन’ असे म्हणून त्याला सोडले तरी तीव्र पापबंध होतो.

३) सामान्यत: शेत राखण्यासाठी गोफण फिरवली. चुकून दगड पाखराच्या वर्मी लागला. हिंसेचे ‘तीव्र’ पाप लागणार नाही. कारण हेतू तसा नव्हता.

४) एकाने सूडबुद्धीने खुनाची योजना केली. गरीबी व पैशांच्या लोभाने इतरांनी साथ दिली. खुनाच्या योजकाला अतिशय तीव्र तर साथीदारांना कमी तीव्र पापबंध होतो.

५) एकजण दुसऱ्याला भर रस्त्यात त्वेषाने मारपीट करीत आहे. काहीजण आनंदाने तमाशा पहात आहेत. काहीजण हळहळत आहेत तर काहीजण मारणाऱ्यास अडवीत आहेत. क्रमाक्रमाने त्यांना कमी–कमी पापबंध लागतील.

६) दयाबुद्धीने पोटाचे ऑपरेशन करणाऱ्या डॉक्टरला पुण्यबंध होतो तर द्वेषाने पोटात सुरा खुपसणाऱ्यास तीव्र पापबंध होतो.

७) चांगले संस्कार करण्यासाठी मुलांना सौम्य शिक्षा दिली. मनातील सद्भावामुळे पापबंध तर नाहीच पण पुण्यबंध होईल.

हा नीती, सदाचार व अध्यात्माचा प्रांत आहे. इथे वरवर दिसायला गुन्हा समान असला तरी शिक्षा (पापबंध) समान नाही.

**********

## ३३. सिद्धान्ताचे सार

संपूर्ण विश्व स्थूलमानाने दोन तत्त्वांमध्ये विभागता येते. चेतन आणि जड (जीव आणि अजीव). आपल्याला दृश्य विश्वात ‘चेतन’ नेहमी ‘जडा’च्याच सान्निध्यात दिसते. मुक्त जीव चैतन्यस्वरूप अथवा अशरीरी असतात. त्यांचे अस्तित्व असते पण सामान्य माणसाला ते जाणवत नाही. संसारी जीव ‘अनंत’ असून त्यांचा शरीरांशी असलेला संबंध ‘अनादि’ आहे.

प्रत्येक शरीरसहित जीव सतत ‘कर्म’ (हालचाल या अर्थाने) करीत असतो. या लेखापुरता आपण मनुष्ययोनीचा विचार करू. मनुष्ययोनीतील जीव काया-वाचा-मनाने कर्म करतो. प्रत्येक कर्माचा जीवामध्ये ‘आस्रव’ (आत येणे, प्रवेश) चालू असतो. जैन शास्त्राप्रमाणे कर्म हे अति-अति-सूक्ष्म परमाणूंचे बनलेले असते. ते जीवाला बांधते. दुसऱ्या परिभाषेत ते जीवाला ‘आवृत’ करते. अशुभ व शुभ दोन्ही कर्मांनी ‘बंध’ होत असतो. जन्मोजन्मी कर्मांचा ‘संचय’ होत रहातो व सुखदु:खात्मक फळे भोगून झाल्यावर कर्मांचा ‘क्षय’ ही होत रहातो. यालाच ‘र्निरा’ हे पारिभाषिक नाव आहे.

आपल्याला पाच इंद्रिये आणि मन  यांच्याबरोबरच विचारशक्ती व विवेक असल्याने आपण कर्म करण्याच्या बाबतीत संपूर्ण पराधीन नाही. चांगल्या कर्मांची निवड करण्याचे आपल्याला स्वातंत्र्य आहे. त्याबाबत आपण मानसिक निश्चयाचे बळ वापरू शकतो. संयम, व्रत इ. धारण करून कर्मांचा प्रवाह रोखू शकतो. हाच ‘संवर’ होय. निश्चयपूर्वक ‘तप’ केल्याने पूर्वकर्मांची ‘निर्जरा’ही होऊ शकते. आठही प्रकारच्या कर्मांचा नाश होऊन आत्मिक शुद्धीची सर्वोच्च अवस्था प्राप्त होणे हाच ‘मोक्ष’  होय.

‘‘जीव-अजीव-आस्रव-बंध-संवर-निर्जरा-मोक्ष’’ ही सर्व जैन शास्त्राने दिलेली पारिभाषिक नावे असली तरी त्यातील आध्यात्मिक तथ्य नक्कीच वैश्विक स्वरूपाचे आहे.

‘अणुरणिया थोकडा, तुका आकाशाएवढा’ ही तुकारामांची अनुभूती किंवा ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाकडे मागितलेले ‘पसायदान’ अशाच अतिशय उन्नत आत्म्यांचे उद्गार आहेत.

**********

## ३४. धर्म–अधर्म : विश्वाचे अनिवार्य घटक

‘धर्म’ आणि ‘अधर्म’ शब्दांचा जगातील विचारवंतांनी जेवढा विचार केला असेल तेवढा क्वचितच दुसऱ्या शब्दांचा केला असेल. जैन शास्त्रात कोणत्या ‘वेगळ्या’ अर्थाने हे शब्द वापरले आहेत, ते आज पाहू.

हे जगत्, विश्व अथवा ‘लोक’ सहा द्रव्यांनी (सब्स्टन्स्, कॅटेगरि) बनला आहे. जैन दर्शन वास्तववादी आहे. ‘जे जे अस्तित्वात आहे, ते द्रव्य होय.’ द्रव्ये सहा आहेत – जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल.

जवळजवळ सर्व भारतीय दर्शनांनी चेतनतत्त्व, परमाणु, आकाश व काल यांचा विचार केला आहे. जैन शास्त्राला आणखी दोन विशेष संकल्पना विश्वरचनेच्या स्पष्टीकरणासाठी आवश्यक वाटतात. ‘धर्म’ आणि ‘अधर्म’ संकल्पना रूढ अर्थांपेक्षा वेगळ्या आहेत. ‘मोशन्’ आणि ‘रेस्ट्’ (इनर्शिआ) यांच्याशी संबंधित असा हा विचार आहे.

‘धर्म’ द्रव्य ‘गतिशील’ पदार्थांच्या गतीला सहाय्य करते. ‘गति’ निर्माण करीत नाही. ‘अधर्म’ द्रव्य ‘स्थितिशील’ पदार्थांना त्या अवस्थेत राहण्यास मदत करते. ‘स्थिति’ निर्माण करीत नाही. ही तत्त्वे अजीव, अमूर्त व सर्व लोकाकाशात व्याप्त आहेत. ‘गति’ व ‘स्थिति’ परस्परविरोधी असल्याने त्याला आधारभूत दोन स्वतंत्र तत्त्वे जैनशास्त्राने मानली आहेत.

विज्ञानाच्या परिभाषेत यांचा अन्वयार्थ लागू शकतो. सर्व ग्रहगोल, तारे अखंड गतिशील आहेत. तरीही नियमित कक्षेत राहतात. स्वैरपणे फिरत नाहीत. निर्जीव गोष्टी जेथे, जशा ठेवल्या, तशाच राहतात. प्रत्येक सजीव आपली कुवत आणि इच्छा याला अनुसरून गति–स्थिति करू शकतो. ‘एनर्जी’ (ऊर्जा) आणि ‘मास्’ (वस्तुमान) यांसंबंधी कार्यरत असलेली ‘ग्रॅव्हिटेशनल् फोर्स्’ ही संकल्पना जैन शास्त्राने, त्या वेळच्या परिभाषेत ‘धर्म–अधर्म’ या शब्दांनी व्यक्त केली असावी.

जैन शास्त्रानुसार विश्वाचा नियामक ‘ईश्वर’ नसल्याने, त्यांनी पदार्थविज्ञानातील काही नियमांचा घेतलेला शोध ‘धर्म–अधर्म’ या तत्त्वांच्या रूपाने केलेला दिसतो.

**********

## ३५. बदल  : एक स्थायी भाव

'सत्' तत्त्वाचा शोध ही तत्त्वज्ञानाच्या प्रांतात अखंड चालणारी प्रक्रिया आहे. कोणी सत् तत्त्वास एक, अखंड नित्य मानतात. कोणी 'क्षणिक' मानतात तर कोणी 'परिणामिनित्य'अथवा 'नित्यानित्य' मानतात.

जैन शास्त्रानुसार जे अस्तित्वात आहे ते सत्. अशी सत् द्रव्ये सहा आहेत. जेवढा आत्मा (जीव) सत्य आहे, तेवढेच अणु-परमाणूही सत्य आहेत. इतरही ४ द्रव्ये सत्य आहेत. आजुबाजूचे जग सत्य आहे. माया, भ्रम, लीला, खेळ नाही. सर्व सहा द्रव्यांमध्ये तीनही काळी समान राहणारा 'ध्रुव' अंश आहे. परंतु त्याचवेळी परिवर्तनशील असाही अंश आहे. ही परिवर्तने निर्माण होतात, लयास जातात. पुन्हा नवी निर्माण होतात. उत्पाद, ध्रौव्य आणि व्यय हे तीनही, सर्व द्रव्यांमध्ये सतत आढळून येतात.

बदल, परिवर्तन, अवस्थांतर हे सर्व वस्तूत सदैव चालू असते. काही बदल वेगाने घडतात तर काही मंदपणे. खडकांची माती होणे, पिसाचा झुकता मनोरा किंचित् अधिक झुकणे, हिमालय किंचिन्मात्र पुढे सरकणे, सूर्याची उष्णता किंचित् कमी होत जाणे ही अतिमंद बदलांची उदाहरणे विज्ञानानेही नोंदविली आहेत.

झाडांमधील ऋतूनुसार बदल सहज दिसतात. आपल्यातील शारीरिक-मानसिक बदलांचे तर आपण स्वत:च साक्षीदार असतो.

विश्वातील सहा द्रव्यांचे, आपापली वैशिष्ट्ये दाखविणारे काही असाधारण गुण आहेत. त्यांमध्ये होत जाणारे बदल, अवस्थांतरे अगणित आहेत. त्यांना जैन परिभाषेत 'पर्याय' म्हणतात. द्रव्य नेहमी गुण व पर्यायासहितच असते.

'नासतो विद्यते भावो, नाभावो विद्यते सत:' - असे गीता म्हणते. असत् कधी सत् होत नाही. सत् कधी असत् होत नाही. जैन तत्त्वज्ञानाला हे मान्यच आहे. परंतु 'सत्' हे पूर्णांशाने अपरिवर्तनीय नाही. काही अंशांनी बदलत रहाणे हाही जैन शास्त्रानुसार 'सत्'चा स्वभाव आहे.

**********

## ३६. कलांचे योगदान

भारतीय संस्कृतीतील कलाविष्कारात जैनांच्या योगदानाची क्षेत्रे चार लेखांमधून स्थूलमानाने जाणून घेऊ.

**साहित्यात उल्लेख : १)** ७२ किंवा ६४ कला **२)** 'कलाचार्य' अथवा 'शिल्पाचार्य' असा निर्देश **३)** 'असि'(शस्त्र, युद्ध); 'मसि' (लेखन, लिपी); 'कृषि'; 'विद्या' (गणित, खगोल); 'वाणिज्य' आणि 'शिल्प' – असे कलांचे वर्गीकरण केलेले दिसते.

आज भारतात, स्तिमित करणारे जे प्राचीन कलाविष्कार आहेत, त्यातील वास्तुकला, मूर्तिकला आणि चित्रकला यांमधील जैनांचे योगदान लक्षवेधक आहे. वास्तूसंबंधीचे प्राचीन साहित्यातील उल्लेख समवसरण अर्थात् सभाभवनाच्या संदर्भात आहेत. सोपान, वीथि, वेदिका, धूलिशाल, गोपुरद्वार, मानस्तंभ, चैत्यवृक्ष, चैत्यस्तूप, प्रासाद, श्रीमंडप – ही नावे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. काळाच्या ओघात चैत्य आणि स्तूप ही बौद्ध वास्तुकलेची वैशिष्ट्ये ठरली. तरी उपलब्ध स्तूपांमध्ये मथुरेचा भग्न स्तूप हा अतिप्राचीन जैन स्तूप असल्याचा निर्वाळा अभ्यासक देतात.

प्राचीन काळी जैन मुनी पर्वत व वनातील गुंफा आणि कोटरांमध्ये एकांतसाधना करीत. ओरिसात (कलिंग) कटकजवळ 'उदयगिरी' पर्वतातील गुंफासमूहात 'हाथीगुंफा' येथे कलिंगसम्राट 'खारवेल'चा संक्षिप्त चरित्र–शिलालेख प्राकृत भाषेत आहे (इ.स.पू. २००). हा सम्राट निश्चितपणे जैनधर्मी होता. इ.स.पू. ३०० मधील जैन गुंफा पटणा–गया मार्गाजवळील 'बराबर' आणि 'नागार्जुनी' पहाडात आहेत.

याखेरीज राजगृह, जुनागढ, श्रवणबेळगोळ, उस्मानाबाद, तमिळनाडमधील सित्तन्नवासल, बादामी तालुक्यातील ऐहोळे, औरंगाबादजवळील वेरूळ, मनमाडजवळील अंकाई–तंकाई आणि इतरही जैन गुंफा व गुंफासमूह वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ग्वाल्हेरच्या किल्ल्याच्या आसपासच्या गुंफा (१५ वे शतक) तीर्थंकरांच्या भव्य मूर्तींनी लक्ष वेधून घेतात.

गुंफानिर्मिती हा कलाविष्काराचा पहिला टप्पा असून नंतर तो मंदिरे, मूर्ती व चित्रकलेच्या स्वरूपात अधिकाधिक सौंदर्यपूर्ण होत गेला.

**********

## ३७. मंदिरनिर्मिती

भारतीय वास्तुकलेचा विकास स्तूप, गुंफा, चैत्य, विहार आणि अखेर मंदिर, या क्रमाने झालेला दिसतो. मंदिरे हा भारतीय वास्तुकलेचा परमोत्कर्ष आहे. आज उपलब्ध असलेल्या स्वतंत्र, संरचनात्मक (स्ट्रक्चरल्), सर्वोत्कृष्ट अखंड मंदिरांचा काळ १० व्या-११ व्या शतकामागे जात नाही.

मौर्यकालीन जैन मंदिराचे अवशेष पटण्याजवळ लोहानीपुर येथे सापडले. 'ऐहोळे' येथील 'मेघुटी' मंदिर (इ.स. ६३४) त्यातील शिलालेखामुळे महत्त्वाचे ठरते. 'कालिदास' व 'भारवी' या संस्कृत कवींच्या काळाची उत्तरमर्यादा त्यामुळे निश्चित झाली. 'द्राविडी' शैलीतील हे मंदिर अभ्यासकांना मोलाचे वाटते. धारवाड जिल्ह्यातील दोन मंदिरे (१२ वे शतक) याच शैलीत आहेत. 'होयसाळ' राजवटीतील (१४ वे शतक) 'मूडबिद्री'चे मंदिर, स्तंभावरील कमळांच्या शिल्पांनी चिरस्मरणीय ठरते.

झाशी जिल्ह्यातील 'देवगड' पहाडीवरील जैन मंदिर-समूहांवर 'नागर' शैलीचा प्रभाव दिसतो. मध्य प्रदेशातील अतिप्रसिद्ध 'खजुराहो' येथील मंदिरांमधील पार्श्वनाथ, आदिनाथ आणि शांतिनाथांची मंदिरे अप्रतिम आहेत. मध्यप्रदेशातीलच 'मुक्तागिरि' मंदिरसमूह पर्वतराजी आणि धबधब्याच्या पार्श्वभूमीमुळे नयनरम्य झाला आहे. यावर 'मुघल शैली'चा प्रभाव आहे.

राजस्थान आणि मारवाडमध्ये तर 'देवालयांची नगरे'च आहेत. जोधपुरचे 'राणकपुर' येथील चतुर्मुखी मंदिर वास्तुकलेचा अजोड नमुना आहे. अर्बुदाचल अर्थात् आबूच्या पहाडातील 'दिलवाडा' येथील पाच प्रमुख मंदिरे तर संपूर्ण भारतीय वास्तुकलेचे भूषण आहेत. त्यांचा इतिहास, दंतकथा आणि सौंदर्यानुभूती - सर्व काही अद्भुत व कल्पनातीत आहे.

सौराष्ट्रातील शत्रुंजय (पालीताणा) आणि गिरनार हे मंदिरसमूह तसेच बिहारमधील 'सम्मेदशिखर' - ही तीर्थंकरांच्या इतिहासाशी संलग्न अशी पवित्र तीर्थक्षेत्रे आहेत.

'याखेरीज नष्ट झालेल्या, नष्ट केलेल्या आणि परिवर्तित केलेल्या जैन मंदिरांची संख्या शेकड्यात मोजावी लागते' - असे पुरातत्त्वविद् म्हणतात.

**********

## ३८. मूर्तिकला

कलिंगसम्राट खारवेलच्या शिलालेखातून (इ.स.पू. २००) स्पष्ट दिसते की इ.स.पू. ३ ऱ्या-४ थ्या शतकात जिनमूर्तींची प्रतिष्ठापना केली जात होती. नंद राजांनी कलिंगमधून नेलेली जिनप्रतिमा खारवेलने परत आणली व तिची स्थापना केली. इतिहासकालीन जैन मूर्तींच्या अभ्यासाची विपुल सामग्री आपल्याला मयुरा संग्रहालयात एकत्रित ४७ मूर्तींच्याद्वारे मिळते. त्या मूर्तींचे व्यवस्थित वर्गीकरण अभ्यासकांनी करून ठेवले आहे. कुषाणकालीन आणि गुप्तकालीन मूर्ती, उपलब्ध मूर्तींमध्ये सर्वात प्राचीन आहेत. जैन प्रतिमा वेगवेगळ्या चिह्नांनी अंकित करण्याची प्रथा आठव्या शतकापासून सुरू झाली असावी, असे अभ्यासक म्हणतात.

धातूंपासून बनविलेल्या मूर्तींमध्ये ब्राँझच्या (तांबे + शिसे) व पितळेच्या मूर्ती प्रमुख आहेत. त्याखेरीज दगडी, संगमरवरी आणि चमकदार लेप केलेल्या मूर्तीही लक्षणीय आहेत. दिलवाडा मंदिरातील चतुर्मुखी मूर्ती चमकदार लेपांनी चित्ताकर्षक झाल्या आहेत.

मोहेन-जो-दडो व हडप्पा येथे सापडलेली सिंधु-संस्कृतीच्या काळातील नग्न मूर्ती आणि पटणा संग्रहालयातील जिन-प्रतिमा यांच्यातील साम्य पुरातत्त्वविदांनी नजरेस आणून दिले आहे. जैन मूर्ती प्राय: कायोत्सर्ग अर्थात् खड्गासनात अथवा पद्मासनात आहेत. बहुतांशी जिन मूर्ती ध्यानमुद्रेत आहेत. ऋषभदेवांच्या मूर्ती खांद्यापर्यंत रुळणाऱ्या केशकलापांनी युक्त आहेत. पार्श्वनाथांच्या मस्तकावर सप्तफणांचा नाग उत्कीर्ण केलेला दिसतो. विशालतेच्या दृष्टीने मध्यप्रदेशातील बडवानीजवळची बावनगजा (८४ फूट) मूर्ती आणि श्रवणबेळगोळची ५६ फूट ६ इंच उंचीची बाहुबलीची मूर्ती या दोन मूर्ती अतिशय प्रसिद्ध आहेत.

जैन दैवतशास्त्रात यक्ष-यक्षिणींचे स्थान महत्त्वपूर्ण दिसते. सर्व तीर्थंकरांच्या संरक्षक यक्ष-यक्षिणींचे साहित्यिक उल्लेखही आढळतात. विविध मंदिरांमध्ये स्तंभ व तोरणांवर अंकित केलेल्या चक्रेश्वरी, पद्मावती, अंबिका इ. यक्षिणींच्या प्रतिमा, अच्युता देवी, सरस्वती, नैगमेश (नैमेश) - या प्रतिमा देखील अतिशय कलात्मक आहेत.

विविध जैन मूर्तींचा काळ, वैशिष्ट्ये इ.चा सविस्तर परिचय देणारे ग्रंथ विशेष जिज्ञासूंसाठी उपलब्ध आहेत.

**********

# ३९. चित्रकला

जैन चित्रकलेचे सर्वात प्राचीन उपलब्ध नमुने सातव्या शतकातील आहेत. ते भित्तिचित्रांच्या स्वरूपात आहेत. तिरुमलाईच्या जैन मंदिरातील चित्रे (१० वे-११ वे शतक) वैविध्यपूर्ण, रेखीव आणि चमकदार रंगांनी आजही चित्ताकर्षक वाटतात.

११ व्या शतकापासून १५ व्या शतकापर्यंतची जैन चित्रे ताडपत्रांच्या हस्तलिखितांमध्ये आढळतात. मूडबिद्री (म्हैसूर) आणि पाटन (गुजराथ) येथील जैन-शास्त्र-भांडारात सचित्र ताडपत्रीय हस्तलिखिते विपुल आहेत. बडोदा संग्रहालयातील काही ताडपत्रीय प्रतीत सोळा विद्यादेवी, यक्ष व अन्य देवतांची रेखीव चित्रांकने आहेत.

कागदाचा शोध इ.स.च्या सुमारे दुसऱ्या शतकात चीनमध्ये लागला. अरब देशांच्या मार्गाने कागद सुमारे अकराव्या शतकात भारतात येऊ लागला. जैन ग्रंथांची कागदावरील हस्तलिखिते १२ व्या शतकापासून बनू लागली. 'कल्पसूत्र' नावाच्या ग्रंथाच्या सचित्र हस्तलिखित पोथ्यांची संख्या सर्वात जास्त आहे. दिगंबर जैन-शास्त्र-भांडारातील सचित्र हस्तलिखितांची संख्याही लक्षणीय आहे.

लाल, निळा, हिरवा, पिवळा या रंगांबरोबरच सोनेरी आणि चंदेरी रंगांचा वापर चित्रांचे सौंदर्य आणि मूल्य खूपच वाढवतो. सोन्यापासून आणि चांदीपासून रंग बनवून या 'मिनिएचर पेंटिंग्ज'मध्ये वापरण्यात कारागिरांचे आणि चित्रकारांचे अतुलनीय कौशल्य दिसते. 'तूलिका' (ब्रश) बनविणाऱ्यांनाही दाद द्यावीशी वाटते.

याखेरीज काष्ठपट आणि वस्त्रपटांवरही चित्रकलेचे उत्कृष्ट नमुने आढळतात. काष्ठपट हे प्रामुख्याने ताडपत्रीय पोथ्यांच्या संरक्षणासाठी पोथ्यांच्या वर आणि खाली लावलेले दिसतात.

केवळ 'कलेसाठी कला' हे जैन कलांचे ध्येय नाही. कलांच्या अविष्कारातून त्यांनी धार्मिक, नैतिक व आध्यात्मिक उन्नतीचा संदेश दिला. संयम, तप, वैराग्य यांना अग्रभागी ठेवूनही, सामान्य व्यावहारिक जीवन जगताना ते सौंदर्यपूर्ण व रसपूर्ण बनविले. भारतीय संस्कृतीतील कलासंवर्धनामध्ये जैन परंपरेने आपला वाटा समर्थपणे उचललेला दिसतो.

जैनविद्येचे 'जैन कला' हे क्षेत्र कित्येक देशी-विदेशी अभ्यासकांना आकृष्ट करीत आले आहे.

**********

## ४०. गुजराथचा राजा कुमारपाल

८-९ व्या शतकात गुजराथेत चावडा (चापोत्कट) वंशाचे राज्य होते. १० व्या शतकात त्यांचा पराभव करून चौलुक्य किंवा सोळंकी वंशाने गुजराथची सत्ता हातात घेतली. तीनशे वर्ष या वंशातील राजे सत्ताधीश होते. 'मूलराज' आणि 'सिद्धराज' यांच्यानंतर 'कुमारपाल' राजा बनला. चौलुक्य (चालुक्य) वंशीय राजे परंपरेने शिवभक्त होते. प्रतिवर्षी सौराष्ट्रातील सोमनाथाची यात्रा करीत असत. अनेक शिवमंदिरेही त्यांनी बांधली.

'हेमचन्द्र' नावाच्या जैन आचार्यांनी 'कुमारपाल' राजास प्राणघातक हल्ल्यातून वाचविले. एका वर्षी सोमनाथ यात्रेच्या प्रसंगी ते कुमारपालबरोबर होते. हेमचन्द्रांच्या उपस्थितीत, साक्षात शंकराने कुमारपालास, पार्श्वनाथांच्या रूपात दर्शन दिले - अशी एक आख्यायिका आहे. त्यांच्या उपदेशाने प्रभावित होऊन कुमारपाल 'जैन श्रावक' बनला. हेमचन्द्र आचार्यांना साहित्यनिर्मितीस अनुकूल असे वातावरण उपलब्ध करून दिले. परिणामी, 'कलिकालसर्वज्ञ' पदवीने अलंकृत अशा या आचार्यांनी तत्त्वज्ञान, पुराणे, एकतिहासिक ग्रंथ, व्याकरण, छंद, कोश, न्याय, योग, स्तोत्र अशी अपूर्व ग्रंथसंपदा निर्माण केली. अनेक उत्तमोत्तम शिष्य तयार केले.

कुमारपाल 'आदर्श श्रावक' तर होताच पण 'आदर्श राजा'ही होता. त्याने आपल्या राज्यात सर्वत्र जिनमंदिरे उभारली, अनेक जाचक 'कर' कमी केले. गरीब लोकांसाठी दानशाळा उभारल्या. निपुत्रिक विधवांची संपत्ती त्यांच्या हयातीत सरकारजमा करण्याची प्रथा बंद केली. शिकार, मद्यपान, जुगार, प्राण्यांची झुंज, मांसाहार इ.ना बंदी घातली. प्रजेला व्यसनमुक्त करण्याचे प्रयत्न केले.

या कल्याणकारी राजाच्या गौरवार्थ अपभ्रंश भाषेत आणि प्राचीन गुजराथीत अनेक काव्ये व लोकगीते रचली गेली. अजूनही ती कृतज्ञतापूर्वक स्मरली जातात.

**********

## ४१. मेगॅ-सीरियल

चोवीस तीर्थंकरांपैकी पहिले तीर्थंकर आदिनाथ ऋषभदेव आपल्या वेगळेपणामुळे खूपच उठून दिसतात. ऋग्वेदातील 'ऋषभ विश्वामित्र' सूक्तांमधून श्रमण परंपरेची काही वैशिष्ट्ये नजरेत भरतात. यजुर्वेद, अथर्ववेद, विष्णुपुराण आणि अग्निपुराणातही त्यांचे उल्लेख आढळतात. भागवतपुराणाच्या ५ व्या स्कंधात त्यांचे समग्र चरित्र येते. ऋषभदेवांच्या शंभर पुत्रांपैकी 'भरत' हे चक्रवर्ती होते व 'भारतवर्ष' हे नाव त्यांच्यावरूनच पडले, असाउल्लेख भागवतपुराणातही येतो. मानवी संस्कृतीच्या आरंभकाळी ऋषभदेवांच्या कार्यकर्तृत्वाचा उमटलेला ठसा वैदिक परंपराही नजरेआड करू शकली नाही.

'इक्ष्वाकु' नामक क्षत्रिय कुळात जन्मलेले ते 'भोगभूमी'च्या अखेरच्या टप्प्यात कार्यप्रवण झाले. सहज मिळणारा अन्न-वस्त्र-निवारा हळूहळू अपुरा पडू लागला. धान्याची पेरणी (शेती), वृक्षलागवड व संवर्धन, अन्न शिजविणे, भांडी तयार करणे, वस्त्रे विणणे, रोगचिकित्सा, घरेबांधणी, नगर-विन्यास, विवाहसंस्थेचा पाया घालणे, कौशल्यानुसार कामांची विभागणी, कला व विद्यांच्या जोपासनेसाठी औपचारिक शिक्षणपद्धती आणि स्वत:च्या मुलींनाही दिलेले शिक्षण - ह्या सर्वांमुळे 'एक प्रगतिशील कार्यप्रवण राजा' अशी ऋषभदेवांची प्रतिमा मनावर ठसते.

आयुष्याच्या उत्तरार्धात, जबाबदारी पूर्णत: पुत्रांवर सोपवून ते विरक्त मुनी, संन्यासी झाले. उग्र तपश्चर्या केली. एका विशाल वटवृक्षाखाली ध्यानमग्न स्थितीत 'केवलज्ञानी' झाले. उर्वरित आयुष्यात मुनिधर्म व श्रावकधर्माची व्यवस्था लावून दिली. माघ कृष्ण त्रयोदशीला 'अष्टापद' अर्थात् कैलास पर्वतावर त्यांचे निर्वाण झाले.

जैन पुराणांनी ऋषभदेवांच्या कार्यप्रवणतेचा आणि विरक्तीचा पट असा काही उलगडून दाखविला आहे की रामायण-महाभारताइतकीच एक अतिभव्य टी.व्ही. सीरियल माझ्या डोळ्यासमोर सतत तरळत असते.

पंथ-संप्रदाय-भेद विसरून, सारा जैन समाज अशी 'मेगॅ-सीरियल' निर्मून खऱ्या अर्थाने धर्माची 'प्रभावना' करेल का ?

**********

## ४२. नयवाद : दृष्टिकोण व अभिप्राय (१)

जैन तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य म्हणून तीन गोष्टींचा उल्लेख सतत केला जातो. नयवाद, स्याद्वाद आणि अनेकान्तवाद. या सर्वांमधला समान धागा असा की, वैचारिक सामंजस्य स्थापन करण्याचे हे प्रयत्न आहेत.

'नय' म्हणजे 'नेणारा' – वस्तू, व्यक्ती किंवा घटनेच्या 'स्वरूपाकडे' नेणारा दृष्टिकोण अथवा अभिप्राय. वस्तु, व्यक्ती, घटना – या तिघानांही एकच शब्द वापरू – 'रिॲलिटी'. रिॲलिटीकडे अनेक दृष्टिकोणांनी, भूमिकांनी पाहता येते. मुळात या रिॲलिटीतच अनंत गुणधर्म अस्तित्वात असतात. म्हणूनच 'नय' ही तत्त्वत: 'अनंत' आहेत. सामान्य व्यक्तीच्या मार्गदर्शनासाठी सात प्रकारचे 'नय' अथवा 'अभिप्रायाच्या दृष्टी' सांगितल्या आहेत.

प्रत्येक प्रकारचा 'नय' हा फक्त एक विशिष्ट अभिप्राय असतो. त्यात सत्यांश असतो पण तो 'सापेक्ष' (रिलेटिव्ह) असतो. 'रिॲलिटी'च्या कोणत्या गुणधर्मावर भर दिला आहे आणि बघणाऱ्याने कोणती 'भूमिका' धारण केली आहे –ह्या दोन्ही गोष्टी मत व्यक्त करताना महत्त्वाच्या असतात.

सात मुख्य नयांपैकी पहिला आहे ''नैगमनय''. विशेष खोलात न शिरता सामान्य माणूस या दृष्टिकोणातून वर्णन करीत असतो. याची उदाहरणे मनोरंजक आहेत. प्रतिवर्षी त्या त्या तिथीला जयंती किंवा पुण्यतिथी साजरी करणे, युद्ध चालू असताना, 'भारत लढत आहे', 'चीन लढत आहे' असे म्हणणे, सामने चालू असताना 'श्रीलंकेचा वेस्ट इंडिजवर विजय' असा उल्लेख करणे, भाजी निवडत असताना फोन आल्यास 'मी स्वयंपाक करीत आहे' असे सामान्य विधान करणे, अपघाताचे वर्णन करताना 'साक्षात् मृत्यू जबडा पसरून समोर उभा होता' असा उल्लेख करणे – ही सर्व नैगम नयाची उदाहरणे होत.

सर्व प्रकारच्या रूढी, अंधश्रद्धा याच नयाच्या अंतर्गत येतात. कविजनांना प्रिय असलेले उपमा, दृष्टान्त, रूपक इ. अर्थालंकारही याच्याच कक्षेत येतात.

**********

## ४३. नयवाद : दृष्टिकोण व अभिप्राय (२)

'संग्रहनया'चा अवलंब करणाऱ्याची दृष्टी, विशिष्ट व्यक्ती, वस्तू अथवा घटनेकडे नसते. अनेकांना लागू पडेल असे विधान करण्याकडे कल असतो. गारा, दवबिंदू, हिम, बाष्प, बर्फ, वाफ या सर्वांमधील 'पाणी' या तत्त्वाकडे वैज्ञानिक लक्ष वेधून घेतो. 'अन्न–वस्त्र–निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत' अशा प्रकारची सर्व विधाने 'संग्रहनय' आहेत. सर्व प्रकारचे, सर्व भाषातले नीति–उपदेश संग्रहनयात येतात. सर्व जीवांमधील 'चेतनत्व' पहाणे हा असाच विशाल संग्रहनय आहे. 'सिंथेटिक स्टँडपॉइंट' अगर 'जेनेरिक व्ह्यू' असे या नयाचे स्पष्टीकरण इंग्रजीत केलेले आहे.

परंतु सतत 'संग्रहनया'ने काम भागत नाही. प्रत्यक्ष व्यवहारात आपल्याला 'नेमकेपणा' आवश्यक असतो. संग्रहनयाच्या अगदी विरुद्ध 'व्यवहारनय' (स्पेसिफिक स्टँडपॉइंट) आहे. 'एक साडी द्या' असे दुकानदाराला सांगून चालत नाही. वेळ फुकट जातो. '७०० रु. किंमतीची, डार्क निळ्या रंगाची, केशरी काठपदराची, कॉटनची कलकत्ता साडी द्या' असे म्हटले तर निवड करणे सोपे जाते. आपल्याला नेमके काय हवे आहे हे न कळणाऱ्या माणसांजवळ या 'व्यवहारनया'चा अभाव असतो.

'ऋजुसूत्र' नयाने वागणाऱ्याची दृष्टी भूतकाळ, भविष्यकाळाची सर्वथा उपेक्षा करते. त्याच्या दृष्टीने 'आज, अभी, इसी वख्त' जे असेल तेच सत्य. दैनंदिन जीवनात हा नय अनेक प्रकारे कार्य करतो. अशा व्यक्ती नाटक–सिनेमा पहात असताना नायक–नायिकांच्या सुखदु:खांशी समरस होतात. चेकने वीस हजार पगार घेणारा माणूस टी.ए.डी.ए. चे १०००/– रु. कॅश मिळाले तर खूष होतो. कारण ते त्याला लगेच खर्चता येतात. मुले दुर्लक्ष करीत असतील तर वृद्ध इतरांना सांगतात, 'मी निपुत्रिक आहे असे समजा.' या वृद्धाची दृष्टी 'ऋजुसूत्र' असली तरी अभिप्राय विदारक सत्यावर प्रकाश टाकतो.

**********

## ४४. शब्दांच्या अंतरंगात

नैगम, संग्रह, व्यवहार व ऋजुसूत्र या चार नयांचे स्वरूप आपण समजून घेतले. यापुढील तीन नयांच्या मदतीने आपण शब्दांच्या अंतरंगात शिरणार आहोत. हे तीन एकाहून एक सूक्ष्म आहेत. हा प्रांत व्याकरणतज्ज्ञ, लेखक, कवी, गीतकार यांचा आहे.

'शब्दनया'त शब्दांची सूक्ष्म छानानी होते. लिंग, वचन, विभक्ती, काळ यांचा विचार होतो. 'दारा', 'पत्नी' व 'कलत्र' यांचा अर्थ एकच असला तरी लिंगे भिन्न भिन्न आहेत. 'आड' आणि 'विहीर', 'रोट' आणि 'रोटी' अशा अनेक शब्दात लिंगभेद व अर्थभेदही आहे. 'पिवळा पीतांबर' अशा द्विरूक्ती या नयाचा जाणकार करीत नाही. नारळाला 'श्रीफल' म्हटले तरी शालीस 'महावस्त्र' म्हणतो, चुकूनही 'अंगवस्त्र' म्हणत नाही. 'गमन', 'आगमन' , 'निर्गमन' आणि 'अधिगमन' यातील भेद जाणतो. एकूण हा व्याकरणाचा प्रांत आहे.

'समभिरूढ' नय आता अनेक समानार्थक शब्दांच्या मुळापर्यंत म्हणजे व्युत्पत्तीपर्यंत जातो. 'राजा', 'नृपति', 'भूपति' या शब्दांच्या व्याकरणाने समाधानी होत नाही. प्रत्येकात असलेली वेगळी अर्थछटाही जाणतो. 'अग्नि', 'हुताशन', 'तपन' या वरकरणी समानार्थी शब्दातील सूक्ष्म भेद जाणतो. शब्दकोश (डिक्शनरी) तयार करताना या नयाचा वापर करावाच लागतो.

'एवंभूत' नयाने कवी, लेखक, गीतकार अनेक शब्दांमधून अचूक शब्दांची निवड करतात. यांच्या दृष्टिकोणातून सिंहासनावर 'राजा' असतो. प्रजापालन 'नृप' करतो. युद्धावर निघालेला 'भूपति' असतो. श्लेष अलंकाराची योजना करताना तो वरकरणी समान दिसणारा शब्द दोन्ही अर्थांनी अचूक वापरतो. 'पंकज' शब्द कमळासाठी वापरायचा की 'बेडका'साठी हेही तोच ठरवितो.

सातही प्रकारचे 'नय' आपण व्यवहारात वापरत असतो. यात 'चांगला-वाईट', 'बरोबर-चुकीचा' असे काहीच नाही. आपला व दुसऱ्याचा, दृष्टिकोण आणि अभिप्राय अधिक चांगला समजण्यासाठी जैन शास्त्राने केलेले हे दिग्दर्शन आहे.

**********

## ४५. अनेकान्तवादी कोण ?

वस्तू-व्यक्ती-घटनेकडे पहाण्याचे किती दृष्टिकोण आणि अभिप्राय असू शकतात याचे विश्लेषण सात नयांच्या द्वारे जैन शास्त्रात केलेले दिसते. याखेरीज 'व्यवहार नय' आणि 'निश्चय नय' ह्या दोन दृष्टींचा उल्लेख जैन साहित्यात वारंवार आढळतो. पहिला दृष्टिकोण लौकिक, व्यावहारिक सामान्यत: रूढ असलेल्या धारणांवर आधरित असतो. 'निश्चय नय' सर्व व्यवहारांचे स्पष्टीकरण पारमार्थिक व आध्यात्मिक पातळीवरून करतो. उदाहरणार्थ, माझ्या सामान्य आयुष्यात मी कोणाचा तरी पुत्र, पिता, पति, काका, मामा इ. आहे. परंतु निश्चय नयाने मी (माझा जीव, आत्मा) या नात्यांच्या पलीकडचा, एकटा, स्वतंत्र आहे. म्हणजेच एकाच वेळी हे नातेसंबंध माझ्यात 'आहेत'ही आणि 'नाहीत'ही.

'मी लहान आहे', 'मी मोठा आहे' अथवा 'तो उंच आहे', 'तो बुटका आहे'ही सर्व विधाने सोपेक्ष आहेत. तुलनेचा संदर्भ लक्षात घेतला की परस्परविरोधी गुण एकाच व्यक्तीत आहेत, असा बोध होतो. अशा प्रकारे 'रिॲलिटी' ही अनेक परस्परविरोधी गुणधर्मांनी युक्त असते.

एकाच वस्तूकडे आपण कोणत्या दृष्टिकोणातून, भूमिकेतून बघतो त्यावर आपली मते ठरत असतात. यासाठी हत्ती आणि दहा आंधळ्यांचा दृष्टान्त सुप्रसिद्ध आहे. या दृष्टान्तात, ते आंधळे आहेत म्हणून त्यांची मते एकांगी आहेत. गंमत अशी की आपण डोळस, बुद्धिमान असूनही केवळ आपलीच मते योग्य मानतो. इतर मतांची उपेक्षा करतो. आपल्या सीमित बुद्धीने एकांगी मताचा आग्रह न धरता 'रिॲलिटी'कडे विविध पैलूंनी बघण्याचे सामर्थ्य आपल्यात विकसित करणे म्हणजे 'अनेकान्तवादी' बनणे होय.

'एक सत् विप्रा: बहुधा वदन्ति' ह्या ऋग्वेदातील वचनात हेच मर्म साठविलेले आहे. परंतु जैन दर्शनाने हा श्रेष्ठ विचार नयवाद, स्याद्वाद व अनेकान्तवादाच्या द्वारे विकसित करून, तो सिद्धान्तरूप बनविला.

**********

## ४६. अनेकान्तवाद आणि सापेक्षतावाद

'अनेकान्तवाद' शब्दातील 'वाद' शब्द 'वादविवाद' या अर्थाने आलेला नाही. तो 'सिद्धान्त' या अर्थाने आलेला आहे. 'अन्त' शब्द टोक, 'दृष्टी, मत, अभिप्राय' या अर्थांचा सूचक आहे. 'एकान्तवाद' म्हणजे आग्रही, पक्षपाती दृष्टी. 'रिॲलिटी'ची व्यामिश्रता लक्षात न घेता एकच टोक पकडून केलेले आकलन व मतप्रदर्शन म्हणजे 'एकान्तवाद'. या विश्वातील कोणतीच गोष्ट 'निरपेक्षपणे' सत्य अगर असत्य नसते. द्रव्य, क्षेत्र, काल, भाव ही चौकट लक्षात घेऊनच विधाने करावी लागतात. अनेकान्तवादी निर्दोष दृष्टीने मतप्रदर्शन करताना प्रत्येक विधानाला 'स्यात्' (कदाचित्, कथंचित्, संभवत:) असे पद जोडावे लागते. 'स्यात्' पद संशयवाचक नाही. ते सापेक्षता दर्शविणारे आहे. अनेकान्तवादी दृष्टी व्यक्त करणारा 'स्यात्' शब्द लावून, आपल्याला वस्तूचे वर्णन 'स्यात् अस्ति', 'स्यात् नास्ति', 'स्यात् अवक्तव्यम्' आणि यांच्या परम्युटेशनने सात प्रकारे करता येते. यालाच 'स्याद्वाद' अथवा 'सप्तभङ्गीनय' म्हणतात.

अनेकान्तवाद एक 'पक्षी' असेल तर 'नयवाद' आणि 'स्याद्वाद' त्याचे दोन 'पंख' आहेत – असे मत काही अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. काहींनी स्याद्वाद व अनेकान्तवादाला 'एकाच नाण्याच्या दोन बाजू' म्हटले आहे.

Theory of Non-absolutism, Multiple Facets of Reality and Truth, Theory of Relative Multiplicity – अशी अनेक इंग्रजी नामकरणे 'अनेकान्तवाद' शब्दाची केलेली दिसतात.

अनेकान्तवादाच्या द्वारे जैन शास्त्राने सामंजस्य, शांततापूर्ण सामाजिक, धार्मिक सहजीवन स्थापण्याचा प्रयत्न केला. जगभरातील विचारवंतांनी या प्रयत्नाची उत्तम दखल घेतली.

सापेक्षतावादाचा सिद्धान्त मांडणाऱ्या आईन्स्टाइन या वैज्ञानिकाने जैनांच्या अनेकान्तवादाबद्दल गौरवोद्‌गार काढले आहेत.

**********

## ४७. 'ऋषिभाषित' ग्रंथातील 'अनेकान्तवाद'

अर्धमागधी भाषेत जी प्राचीन ग्रंथसंपदा आहे त्यातील एक अमूल्य रत्न आहे 'ऋषिभाषित' (इसिभासिय). भारतातील वैदिक आणि श्रमण दोन्ही परंपरांमधील नि:स्पृह, निरासक्त विचारवंतांचा 'ऋषि' आणि 'अर्हत्' (पूजनीय) या शब्दाने गौरव करणाऱ्या या ग्रंथात 'अनेकान्तवादा'चे सच्चे प्रतिबिंब दिसते. खुद्द ऋषिभाषित या ग्रंथात 'अनेकान्तवाद' शब्दाचा निर्देश नसला तरी त्याच्या रोमरोमात उदारमतवाद भिनलेला आहे. जात-पात, गोत्र, संप्रदाय यांच्या पलीकडे जाऊन प्रत्येक 'ऋषि'च्या चिंतनातील सारपूर्ण विचार या ग्रंथात नोंदविले आहेत. ४५ ऋषींचे हे अध्यात्म दर्शन आहे.

ऋषिभाषितातील विचारवंत वैदिक, जैन व बौद्ध या तीनही परंपरांमधील आहेत. काही प्राचीन आहेत तर काही समकालीन आहेत. देव नारद, असित देवल, अंगिरस भारद्वाज, याज्ञवल्क्य, विदुर, कृष्ण द्वैपायन, आरुणि – ही नावे मुख्यत: वैदिक परंपरेत सुप्रसिद्ध आहेत. उपनिषदे, महाभारत व पुराणात ती आढळतात. यातील काही नावे जैन व बौद्ध ग्रंथातही दिसतात. ऋषिभाषितातील वज्जीयपुत्त, महाकश्यप, सारिपुत्त ह्या बौद्ध परंपरेतील व्यक्ती त्रिपिटकात निर्दिष्ट आहेत. मंखलिपुत्त, रामपुत्त, अंबड आणि संजय बेलट्ठिपुत्त ही व्यक्तिमत्वे जैन-बौद्धेतर श्रमण परंपरेतील आहेत.

या ऋषींचे विचार व्यक्त करताना जैन शास्त्रातील काही पारिभाषिक शब्दांचा उपयोग केलेला दिसतो. संग्रहकर्ता जैन असल्याने ते साहजिकच आहे. तरीही त्यांचे विचार जास्तीत जास्त प्रामाणिकपणे नोंदवले आहेत. अभ्यासकांनी या ग्रंथांचा काळ इ.स.पू. ३ रे -४ थे शतक असा नोंदविला आहे.

'ऋषिभाषित' ग्रंथ प्राकृत भारती अकादमी, जयपुर यांनी १९८८ मध्ये हिंदी व इंग्रजी भाषांतरासहित प्रकाशित केला आहे. 'ऋषिपंचमी'ला प्रत्येक भारतीयाने आवर्जून वाचावा असा हा प्राचीन अर्धमागधी ग्रंथ आहे.

**********

## ४८. क्षमापना कर्मसिद्धान्त

'माणूस कोण ?' याची उत्तरे अनेकांनी अनेक प्रकारे देऊन ठेवली आहेत. त्यातील एक असे आहे – 'जो चुकतो तो माणूस.' सामान्यत: दुसऱ्याच्या चुकांकडे डोळे लावून बसलेले अनेक महाभाग असतात. ते भिग, ती दुर्बिण प्रत्येकाने आपल्या वर्तनाकडे वळवावी म्हणून जैन परंपरेत पर्युषणपर्वानंतर 'क्षमापने'चा प्रघात आहे.

आपल्याहातून कळत–नकळत घडलेल्या अपराधांची क्षमा मागणे आणि इतरांच्या अपराधांना, चुकांना क्षमा करणे असा दुहेरी अर्थ 'क्षमापना' शब्दात अंतर्भूत आहे. 'तस्समिच्छामि दुक्कडं' ही प्राकृत पदावली त्यावेळी उच्चारली जाते. 'माझी दुष्कृते मिथ्या होवोत' अथवा 'त्या दुष्कृतांची मी समीक्षा करतो' असा अर्थ या पदांचा दिला जातो.

दहा उत्कृष्ट गुणांच्या यादीत 'उत्तम क्षमा' अग्रभागी आहे. नुसतीच 'दुष्कृतगर्हा' करणे पुरेसे नाही तर 'सुकृत–अनुमोदने'चा सकारात्मक विचारही पाठोपाठ येतो. 'दुष्कृतगर्हा' म्हणजे हातून घडलेल्या अपराधांची, चुकांची निंदा. 'सुकृतानुमोदना' म्हणजे आपण इतरांनी केलेल्या सत्कृत्यांना दिलेला पांठिबा व गौरव होय. 'खामेमि सव्वे जीवे' या सुप्रसिद्ध श्लोकात सर्व–जीव–क्षमापनेनंतर 'माझी सर्वांशी मैत्री असो, कोणाशीही शत्रुत्व नसो' असेही म्हटले जाते.

जैन धर्मात क्षमापनेचे विशेष महत्त्व आहे हे खरे परंतु जगातल्या सर्व आध्यात्मिकांनी या मुद्याची दखल घेतली आहे. ख्रिश्चन धर्मात confession आणि forgivance ला विशेष स्थान आहे. हिंदू धर्मातही पूजेच्या अखेर 'अपराधसहस्राणि क्रियते अहर्निशं मया' असे म्हणून परमेश्वराजवळ क्षमायाचना केली आहे. सर्वांनाच हे मान्य करावे लागेल की दुबळ्यांच्या क्षमेला कोणी किंमत देत नाही तर, 'क्षमा वीरस्य भूषणम् ।'

**********

## ४९. कर्मसिद्धान्त

या लेखाने ‘जैन विचारधारा’ या लघुलेखमालेची सांगता होत आहे. आत्तापर्यंत ‘कर्मसिद्धान्त’ केवळ दुय्यमपणे येऊन गेला. या लघुलेखात, शब्दमर्यादा लक्षात घेऊन केवळ महत्त्वाची वैशिष्ट्ये नमूद केली आहेत. जैन साहित्यात कर्मसिद्धान्तावर आधारित साहित्याचा मोठा स्वतंत्र विभागच आहे. जिज्ञासूंनी त्यासाठी मूलगामी, अनुवादित अगर स्वतंत्र ग्रंथ जरूर अवलोकन करावेत.

* अहिंसा आणि अनेकान्तवाद जैन शास्त्राची आधारशिला आहे तर कर्मसिद्धान्त हा आधारढाचा अथवा कणा आहे.

* मन-वचन-कायेच्या सर्व स्पदनांना, हालचालींना ‘कर्म’ म्हटले आहे.

* आत्म्याचा (जीवाचा) व कर्मांचा संबंध ‘अनादि’ आहे, हे यातील गृहीतकृत्य आहे.

* राग-द्वेष इ. विकार ‘कर्मबीज’ आहेत. त्यातूनच जन्म-मरणरूप संसारवृक्ष फोफावतो. हा बीज-वृक्ष संबंध अर्थातच चक्राकार आहे. बीज दग्ध केले तरच अंकुर फुटणार नाही.

* कर्म हे अतिसूक्ष्म परमाणू-स्वरूपात असते. हे सूक्ष्म-कार्मणशरीर आत्म्याबरोबर पुढील जन्मात संसृत होते.

* कर्मपरमाणू स्वत: अचेतन असूनही, आत्म्याच्या संपर्कात आल्यावर विविध भावरूपी अवस्थांतरे निर्माण करतात.

* कर्मे ही ‘अशुभ’, ‘शुभ’ व ‘शुद्ध’ अशा तीन प्रकारांनी निर्दिष्ट केलेली आहेत. एकाहून एक श्रेष्ठ आहेत.

* आत्म्याच्या स्वाभाविक गुणांना शुभाशुभ कर्मे ‘बद्ध’ अगर ‘आवृत’ करतात.

* ज्ञानावरणीय इ. आठ प्रकारांमध्ये ती विभागलेली आहेत.

* प्रत्येक जीव त्याच्या प्रत्येक कर्माचा कर्ता व भोक्ता आहे.

* ‘जगन्नियंता’ व ‘कर्मफलदाता’ अशा ईश्वराची संकल्पना जैन शास्त्रास संमत नाही.

* अहिंसापालन, संयम, तप इ. साधनांनी मनुष्य, हे संसारचक्र भेदून स्वत:च ‘मुक्त’ होऊ शकतो.

प्रिय वाचकहो ! लघुलेखमालेच्या या प्रामाणिक प्रयत्नांना दिलेल्या भरघोस अनुकूल व अपवादात्मक प्रतिकूल प्रतिक्रियांबद्दल धन्यवाद !!!

**********